


# कायदा : एक प्रकाशझोत

(कायदेविषयी माहिती पुस्तिका)

- विधी सेवा प्राधिकरण संबंधी माहिती
- महिला संबंधी कायदेविषयक माहिती
- बालकांसंबंधीचे कायदे
- अपंग व्यक्ति संबंधीचे कायदे
- इतर महत्वाच्या कायद्यांची माहिती

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई

# कायदा : एक प्रकाशस्रोत

(कायदेविषयी माहिती पुस्तिका)

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई

105, उच्च न्यायालय, पी.डब्ल्यु.डी. बिल्डींग, फोर्ट, मुंबई 400 032.

फोन : 022-2269 1395, 2269 1358 फॅक्स : 022-2267 4295

प्रकाशक :-

**महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण**

१०५,पी. डब्ल्यू डी इमारत, मुंबई उच्च न्यायालय,

फोर्ट, मुंबई - ४००० ०३२.

# प्रस्तावना

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणातर्फे विधी साक्षरता शिबिरे भरविली जातात. विधी साक्षरता शिबिरे भरवित असताना आमच्या असे लक्षात आले की, खेडयापाडयात राहणारे अशिक्षित मागासवर्गीय, आदिवासी कामगार यांना शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती नसते. त्यामुळे त्यांना त्यांचा लाभ घेता येत नाही. तसेच या विविध कायदयांमध्ये त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाबाबत दाद मागण्याकरीता तरतुदी आहेत. परंतु, अज्ञानामुळे त्यांना त्यांच्यावर होणारे अन्याय सहन करावे लागतात. कायदयाच्या भाषेत कायदेविषयक अज्ञान हा बचाव होऊ शकत नाही. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण अज्ञान दूर करण्याकरीता विधी साक्षरता शिबिरांद्वारा प्रयत्न करीत असते. आज शासनातर्फे साक्षर करण्याकरीता विविध योजना आखल्या जातात. परंतु, फक्त साक्षर होऊन चालत नाही तर त्याचप्रमाणे विधी साक्षर होणेसुध्दा गरजेचे आहे. मनुष्याला जन्मापासून मृत्युपर्यंत कायदयाची साथ आवश्यक असते. मनुष्य जन्मतो त्यावेळेस त्याच्या जन्माची नोंद ही जन्म मृत्यू कार्यालयात करणे कायदयाने आवश्यक असते. त्यानंतर आयुष्य संपेपर्यंत विविध प्रकारच्या येणाऱ्या समस्येवर कायदयाची साथ घ्यावी लागते. मृत्यूनंतर सुध्दा मृत्यूची नोंद कार्यालयात होणे आवश्यक असते.

आज न्यायालयात हजारो प्रकरणे न्यायाच्या प्रतिक्षेत आहेत. प्रलंबित प्रकरणाचा जलद निपटारा होण्याकरीता वैकल्पिक वाद निवारण पध्दतीचा उपयोग केला जाणे आवश्यक आहे. त्याची परिपूर्ण माहिती हया पुस्तकात थोडक्यात दिलेली आहे. तसेच गरीब, मागासवर्गीय आदिवासी जनता आर्थिक व इतर कारणांमुळे होणाऱ्या अन्यायाबाबत दाद मागू शकत नाही. त्यांच्याकरीता विधी सेवा प्राधिकरणातर्फे पुरविण्यात येणारी सेवेची त्यांना हया पुस्तकाद्वारे माहिती होईल.

महिलांच्या हिताचे रक्षण करणारे अनेक कायदे आहेत. परंतु, या कायदयांची माहिती संबंधितांपर्यंत पोहोचणे अत्यावश्यक आहे. तसेच बालकांचे हक्क त्यांना असलेला शिक्षणाचा अधिकार याची माहिती जनतेस असणे अगत्याचे आहे. अशाच प्रकारचे अपंग व्यक्तींना, वरिष्ठ नागरिकांना न्यायालयीन चौकशी अधीन बंदीचे अधिकार व जामीन हया सर्वांबाबत असलेली कायदयांची माहिती सर्वांनाच उपयुक्त ठरेल. हया सर्व कायदयांची माहिती सोप्या भाषेत प्रकाशित करीत आहोत.

उपलब्ध असणारे कायदे सोप्या भाषेत महाराष्ट्रातील दुर्गम भागात राहणाऱ्या लोकांपर्यंत पुस्तक रुपाने पोहोचले तर थोडया प्रमाणात आपण त्यांना शिक्षित केल्याचे समाधान लाभेल.

उपरोक्त पुस्तकात दिलेल्या कायदयांचे मराठीत संकलन करुन आपल्यासमोर ठेवतांना मला फार आनंद होत आहे. हया पुस्तकाचा उपयोग विविध स्तरावरील सर्व घटकांना नक्कीच होईल.

या पुस्तकाचा मुख्य उद्देश जनतेकरीता कायद्यात असलेल्या तरतूदी विषयी माहिती सोप्या मराठी भाषेत देऊन त्यांना विधी साक्षर करणे असा आहे. त्यामुळे या पुस्तकात समाविष्ट कायद्याबाबत माहितीच्या मजकूराच्या आधारे कायदेशीर प्रकरणासाठी उपयोग करणे अपेक्षित नाही. त्यासाठी मुळ शासकीय अधिनियमांचा व कायद्याच्या पुस्तकांचा उपयोग करावा.

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई
१०५, उच्च न्यायालय, पी.डब्ल्यु.डी. बिल्डींग,
फोर्ट, मुंबई ४०० ०३२.

पी. एन. देशमुख
सदस्य सचिव



**मा. न्यायमूर्ती मोहित शाह**
मुख्य न्यायमूर्ती, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई
व प्रमुख आश्रयदाते
महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण

# संदेश

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाकडून "कायदा–एक प्रकाशझोत" ही कायदेविषयक पुस्तिका सोप्या मराठी भाषेत पुस्तकरुपाने प्रकाशित होत आहे ही आनंदाची बाब आहे. विविध कायदेशीर तरतुदींची माहिती सामान्य नागरिकांपर्यंत पोहचणे ही आजची गरज आहे.

आपल्या देशात आज बहुतांश जनता कायदेशीर बाबींबाबत अज्ञानी आहे. त्यांना विधी साक्षर करणे आवश्यक आहे. ही पुस्तिका म्हणजे विधी साक्षरतेमध्ये टाकलेले एक पाऊल आहे. सामान्य नागरिकांचा दैनंदिन जीवनात ज्या कायदेशीर बाबींशी संबंध येतो, त्या कायदेशीर बाबी मराठीत सोप्या भाषेत हया पुस्तिकेत दिलेल्या आहेत. हया पुस्तिकेचा फायदा सर्वसामान्य जनतेस होईल यात शंका नाही.

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणातर्फे राबविण्यात येणाऱ्या हया उपक्रमास व प्रकाशित करण्यात येणा–या हया पुस्तिकेस माझ्या अनेक शुभेच्छा.

मा. श्री. मोहित शहा,



**मा. न्यायमूर्ती रंजना देसाई**

न्यायमूर्ती, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई

व कार्यकारी अध्यक्षा

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण

# संदेश

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाकडून "कायदा–एक प्रकाशझोत" ही कायदेविषयक माहिति प्रकाशित होत आहे हे ऐकून फारच आनंद वाटला. महाराष्ट्रातील बरीचशी जनता ही दुर्गम ठिकाणी राहते. त्याच्यांपर्यंत राज्य शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध योजना पोहचत नाहीत. तसेच खेडयापाडयातील लोक, आदिवासी, मागासवर्गीय यांच्यावर नेहमी अन्याय होत असतो. त्यांचा मुकाबला करण्याकरीता कायदयामध्ये तरतुदी आहेत. परंतु त्यांना त्याबद्दलची माहिति नसल्यामुळे ते अधिकारापासून वंचित रहातात. त्यांना त्यांच्या अधिकाराबाबत साक्षर करणे आवश्यक आहे. जोपर्यंत प्रत्येक व्यक्ती कायदेविषयक ज्ञानाबद्दल साक्षर होत नाही तोपर्यंत माणसामाणसामधील असमानतेची दरी भरुन येणार नाही. सर्व जनतेस कायदयाबाबतची प्राथमिक माहिति देण्याकरीता विधी सेवा प्राधिकरणामार्फत विधी साक्षरता शिबीरे घेऊन त्यांना शिक्षीत करण्याचा प्रयत्न केला जातो.

समाजातील महिला वर्ग, वरिष्ठ नागरीक, कामगार, अपंग, बालके इत्यादी संबंधी कायदेविषयक माहिति व्हावी म्हणून त्यांचे संदर्भातील कायदयाचे सोप्या मराठी भाषेत पुस्तक काढून कायदेविषयक माहिति पोहचवण्याचा हा प्रयत्न अत्यंत स्तुत्य असा आहे. या पुस्तिकेचा सर्व तळागाळातील जनतेस उपभोग होईल.

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणातर्फे प्रकाशित होणाऱ्या माहिति पुस्तिकेस माझ्या शुभेच्छा.

मा. श्रीमती. रंजना देसाई,

# अनुक्रमणिका

## विभाग - १

**विधी सेवा प्राधिकरण संबंधी माहिती**

| | | |
|---|---|---|
| १. | विधी सेवा - काळाची गरज | १ |
| २. | विधी सेवा प्राधिकरण कायदे विषयक माहिती | ३ |
| ३. | वैकल्पिक वाद निवारण पध्दती (ADR ) | ५ |
| ४. | लोकन्यायालय | ७ |
| ५. | मध्यस्ती - काळाची गरज | १० |


## विभाग - २

**महिला संबंधी कायदेविषयक माहिती**

| | | |
|---|---|---|
| १. | गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्र (गर्भलिंग निवड प्रतिबंध) कायदा-१९९४ | १३ |
| २. | कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदा - २००५ | १६ |
| ३. | हुंडा प्रतिबंधक कायदा - १९६१ | १८ |
| ४. | पोटगी संबंधी कायदेशीर तरतूदी | २० |


## विभाग - ३

**बालकांसंबंधीचे कायदे**

| | | |
|---|---|---|
| १. | बालविवाह प्रतिबंधक कायदा - १९२९ | २३ |
| २. | बालकामगार प्रतिबंध व नियमान कायदा - १९८६ | २४ |
| ३. | बाल न्याय कायदा | २५ |
| ४. | शिक्षण अधिकार कायदा | २७ |


## विभाग - ४

**अपंग व्यक्ति संबंधीचे कायदे**

| | | |
|---|---|---|
| १. | मानसिक आरोग्य कायदा - १९८७ | २९ |
| २. | अपंग व्यक्ति (हक्क, समान संधी व पूर्ण सहभाग) कायदा - १९९५ | ३० |
| ३. | न्यास कायदा - १९९९ | ३२ |


## विभाग - ५

**इतर महत्त्वाच्या कायद्याविषयी माहिती**

| | | |
|---|---|---|
| १. | वरिष्ठ नागरिकांचे अधिकार | ३३ |
| २. | अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा | ३६ |
| ३. | मोटार/वाहन व रेल्वे अपघात नुकसान भरपाई विषयक माहिती | ३९ |
| ४. | ग्राहक संरक्षण कायदे विषयक माहिती | ४१ |
| ५. | न्यायालयीन चौकशी अधीन बंदींचे अधिकार व जामीनावर मुक्त होण्याबाबतच्या तरतूदी | ४४ |
| ६. | कामगार नुकसान भरपाई कायदेविषयक माहिती | ४८ |
| ७. | रॅगिंग | ४९ |

# विधी सेवा प्राधिकरण संबंधी माहिती

## विधी सेवा - काळाची गरज

भारतीय संविधानाने आम्हा भारतीयांना आर्थिक सामाजिक व राजकीय न्याय प्रदान करण्याचे अभिवचन दिले. अनेक दुर्बल, निरक्षर मागासवर्गीय, आदीवासी यांना आपल्या हक्कांची अधिकारांची माहिती नाही. त्यामुळे त्यांच्यावर सतत अन्याय होत असतो. अन्यायाविरुध्द लढण्याचे त्यांच्यात परिस्थिती नुसार बळ निर्माण करणे व त्यांना मुख्य प्रवाहात आणणे हे आपल्या सर्व नागरीकांचे कर्तव्य आहे.

"न्याय सर्वांसाठी" हे विधी सेवा प्राधिकरणाचे घोषवाक्य आहे. भारतीय संविधानानुसार सर्व नागरीकाना सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय प्रदान करण्याचे अधिकार प्राप्त होतात. राज्य घटनेचे कलम १४ नुसार सर्व नागरीकांना समान न्यायाची संधी दिलेली आहे. त्याचप्रमाणे कलम ३५ अ नुसार समाजातील दुर्बल घटकाना मोफत कायदेविषयक सहाय्य देण्याची राज्य शासनाची जबाबदारी आहे. समान न्यायाची संधी म्हणजे न्यायालयीन प्रक्रीयेमध्ये सर्वांना सहभागाची समान संधी, जेणेकरुन समाजातील कोणतीही व्यक्ती किंवा घटक न्यायापासून वंचीत राहू नये. परंतु न्यायालयात न्याय मागण्याकरीता आपल्या हक्कांची जाणीव असणे व त्याबाबत उपलब्ध असणाऱ्या कायद्यांची माहिती असणे आवश्यक आहे. तसेच न्यायालयात न्यायासाठी दाद मागण्याकरीता न्यायालयीन खर्च म्हणजेच कोर्ट फी व इतर खर्च तसेच न्यायालयापुढे प्रकरणाची योग्य प्रकारे मांडणी करण्यासाठी तज्ञ वकीलांची निवड व त्याकरीता लागणारा खर्च या सर्वांची आवश्यकता असते.

विधी सहाय्य हा न्यायदान प्रक्रियेतील एक अविभाज्य घटक आहे. या महत्वाच्या घटकाचे उद्दीष्ट समाजातील दुर्बल मागासवर्गीय घटकांना न्याय मिळवून देणे हे आहे. कोणताही कायदा, कल्याणकारी योजना व इतर काहीही असो, जोपर्यंत लोकांमध्ये हक्कासंबंधी व ते प्राप्त करण्यासाठी त्यावरील उपाय योजनेबद्दल अज्ञान असते तोपर्यंत अशा कायद्यांची व कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी योग्य रितीने होऊ शकत नाही. त्यासाठी संविधानाच्या कलम ३९ अ मधील निर्देशानुसार सुरुवातीस महाराष्ट्र राज्य कायदेविषयक सहाय्य व सल्ला मंडळाची स्थापना करण्यात आली आहे सदर मंडळाने मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला योजना १९७९ ही अमलात आणली. दरम्यान भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने "Hussainara Khatoom V, Home Secretary, State at Bihar, AIR 1979 SC1369" या प्रकरणामध्ये भारत सरकारने गोरगरीबाना विधी सेवा उपलब्ध करुन देण्याची योजना तयार करावी असे निर्देश दिले होते त्यानुसार न्यायमूर्ती श्री. पी. एन. भगवती यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली व त्या समितीच्या अहवालामध्ये राज्य कायदेविषयक सहाय्य व सल्ला योजना १९७९ चे अंतर्गत देण्यात येणारी सहाय्य व सल्ला तसेच प्रलंबीत खटल्यांची संख्या कमी करण्यासाठी भरवण्यात येणाऱ्या लोकन्यायालयांना वैधानिक मान्यतेची आवश्यकता आहे असे नमूद करण्यात आले. त्यानुसार विधी सेवा प्राधिकरण कायदा १९८७ हा पारित करण्यात येऊन ते १९९४ पासून

अंमलात आला त्यानुसार राज्यात दुर्बल घटकांना मागासवर्गीय स्त्रिया, मुले व इतरांना पुरविण्यात येणाऱ्या विधी सेवा व लोकन्यायालयाचे आयोजन यास वैधानिक मान्यता देण्यात आली त्यानुसार राज्यामध्ये राज्य विधी सेवा प्राधिकरणाची कार्यालये अस्तित्वात आली.

**<u>विधी सेवा प्राधिकरणाचे उद्देश व कार्य :</u>**

विधी सेवा प्राधिकरण कायदा १९८७ च्या तरतुदीनुसार राष्ट्रीय पातळीपासून ते तालुका पातळीपर्यंत विधी सेवा प्राधिकरण व विधी सेवा समित्या स्थापन झाल्या आहेत. संविधानाच्या निर्देशानुसार लाभधारक लोकांना विविध कायदे आणि वेगळे अधिकार, कर्तव्यांची माहिती देण्यासाठी आणि अधिकाराचे उल्लंघन होऊन त्यांच्यावर अन्याय झाल्यास न्याय कसा प्राप्त करावा या संबंधी मार्गदर्शन करण्यासाठी कायदेविषयक शिबिरे, चर्चासत्रे, कार्यशाळा या माध्यमातून लोकांमध्ये कायद्यासंबंधी जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. तसेच न्यायालयातील प्रलंबित खटल्यांची संख्या कमी करण्याच्या उद्देशाने लोक अदालतीचे आयोजन करणे, सामाजिक व आर्थिक दृष्टया दुर्बल घटक व गोरगरिबांना मोफत विधी सेवा सदस्य पुरवणे हे प्रमुख उद्देश आहेत. विधी सेवा प्राधिकरण अधिनियम १९८७ च्या कलम १२ च्या अंतर्गत येणाऱ्या प्रत्येक भारतीय नागरिकास विधी सेवा दिली जाते. ज्यात महिला व मुले, अनुसूचीत जाती–जमातीतील व्यक्ती, अपंग व्यक्ती, ज्याचे वार्षिक उत्पन्न रु ५०,०००/– पेक्षा जास्त नाही अशा व्यक्ती, नैसर्गिक आपत्ती, वांशिक व जातीय हिंसाचार, पूर, दुष्काळ, भूकंप पिडीत, औद्योगिक कामगार, कस्टडीतील व्यक्तींचा समावेश होतो.

# विधी सेवा प्राधिकरण कायदेविषयक माहिती

## कार्ये

विधी सेवा प्राधिकरण/समिती द्वारा निम्न लिखित कार्ये केली जातात :—

- ❖ न्यायालय/न्यायाधिकरण/प्राधिकरण समक्ष कोणतेही प्रकरण किंवा इतर कायदेशीर कार्यवाही चालविण्याच्या प्रक्रियेत समुपदेशनाच्या स्वरुपात मोफत विधी सहाय्य पुरविणे आणि मोफत विधी सेवा पुरविणे.
- ❖ खर्च व वेळेची बचत करुन तसेच तांत्रिक बाबींना अडसर टाळून जलदगतीने न्याय मिळवून देण्याच्या हमी करीता, प्रलंबित प्रकरणांमध्ये तसेच असे वाद जे न्यायालयासमक्ष आणले गेले नाहीत अशा वादांमध्ये सुध्दा समझोता करीता लोक न्यायालय आयोजित करणे.
- ❖ वैवाहिक वाद मध्यस्थ आणि समेट पध्दतीने मिटविणे.
- ❖ कज्जे वादातील पक्षकार आणि सर्व सामान्य जनतेत, सामाजिक व विधी दृष्टया महत्वाच्या मुद्दयांवर कायदेशीर बाबी संबंधी जागरुकता निर्माण करणे.
- ❖ कैद्यांना आणि न्यायाधिन बंदींना मोफत विधी सेवा प्रदान करणे.

## विधि सेवा प्राधिकरण/समिती खालील व्यक्तींना मोफत विधी सेवा पुरविते :—

- ❖ अनुसूचित जाती किंवा जमातीतील व्यक्ती
- ❖ अवैध मानवी व्यापारातील बळी किंवा भिकारी
- ❖ स्त्रिया अथवा बालके
- ❖ अपंग व्यक्ती म्हणजेच अशा व्यक्ती ज्या अंधत्व, कुष्ठरोग, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यात असमर्थता बहिरेपणा, मानसिक असमर्थता यांनी ग्रस्त आहेत.
- ❖ सार्वत्रिक आपत्ती, जातीय हिंसाचार, जातीय अत्याचार, पूर दुष्काळी, भूकंप किंवा औद्योगिक आपत्तीचे बळी.
- ❖ औद्योगिक कामगार.
- ❖ अन्विक्षाधीन, न्यायालयीन कोठडीत असलेल्या व्यक्ती ज्यांमध्ये सुरक्षागृहातील किशोरवयीन अपराधी, म्हणजेच १८ वर्षे पर्यंत वय असलेल्या व्यक्तींचा किंवा मनोरुग्णालयातील अथवा शुश्रूषालयातील मानसिक रुग्ण यांचा समावेश आहे.
- ❖ वार्षिक उत्पन्न रु ५०,०००/— पेक्षा कमी असलेल्या व्यक्ती.

## कोणकोणत्या विषयांसंबंधात कायदेशीर सेवा उपलब्ध करुन घेता येतील?

- ❖ दिवाणी स्वरुपाच्या सर्व प्रकरणांमध्ये जसे की, संपत्तीविषयक वाद, वैवाहिक आणि ताबा विषयक प्रकरणे, कामगार किंवा सेवा विषयक प्रकरणे, वाहन दुर्घटना प्रसंगी नुकसान भरपाई, उपभोक्ता विवाद इत्यादी.
- ❖ फौजदारी अपराध अंतर्गत सर्व प्रकरणे.
- ❖ भारतीय संविधानाद्वारे प्रदान केलेल्या मुलभुत अधिकारांचे उल्लंघन अंतर्गत सर्व प्रकरणे.

## कोणकोणत्या विषयांसंबंधात कायदेशीर सहाय्य उपलब्ध करुन घेता येणार नाही?

- ❖ मानहानी :
- ❖ विद्वेषपूर्ण अभियोग :
- ❖ न्यायालयाचा अवमान किंवा खोटी साक्ष देणे या आरोपाखाली कार्यवाही करण्यात येणाऱ्या व्यक्ती,
- ❖ कोणत्याही निवडणूकसंबंधी कार्यवाही

- आर्थिक गुन्हेसंबंधी आणि सामाजिक कायदयांच्या विरुध्द गुन्हे जसे की, अस्पृश्यता किंवा जातीच्या आधारावर किंवा जातीय पूर्वग्रह दुषिततेच्या विरोधातील तक्रारींचा प्रतिवाद करणे.

## विधि सहाय्य प्राप्त करण्यासाठी कशाप्रकारे अर्ज करावा ?

- संक्षिप्त स्वरुपात तक्रार किंवा सहाय्यता प्राप्त करण्याचे कारण नमूद करुन एक लिखित स्वरुपात अर्ज दाखल करुन :
- जर अर्जदार अशिक्षित असेल किंवा लिहिण्याच्या स्थितीत नसेल तर, विधी सेवा प्राधिकरण/समिती चे सदस्य सचिव किंवा अधिकारी त्यांचे तोंडी निवेदन नोंदवून घेतील आणि नोंदविलेल्या निवेदनावर त्याची सही/अंगठयाचा ठसा घेतील आणि असे निवेदन अशा व्यक्तीचा अर्ज समजण्यात येईल.
- अर्जदारास विधी सेवा प्राधिकरण/समितीकडे विनाशुल्क उपलब्ध असलेल्या एका विहित नमुन्यात शपथपत्र निष्पादित करुन दयावे लागेल, ज्यायोगे अर्जदाराची विधी सहाय्य प्राप्त करण्यासंबंधी निकष तपासून घेता येईल.
- विधी सेवा प्राधिकरण/समितीचे सदस्य सचिव अर्जदाराची त्याने शपथपत्रामध्ये सांगितलेल्या तथ्यांची पडताळणी करण्यासाठी तपासणीसुध्दा करु शकतात.

## कोणत्या स्वरुपाची विधी सहाय्यता पुरविली जाते ?

- कोणत्याही न्यायालयीन कार्यवाहीशी संबंधित देय किंवा झालेला सर्व खर्च,
- कोणत्याही कायदेशीर कार्यवाहीमध्ये मसुदालेखन करणे, दस्तऐवज तयार करणे आणि कायदेशीर कार्यवाहीमध्ये विधी व्यवसायीने प्रतिनिधीत्व करणे यासाठीचा खर्च
- कायदेशीर कार्यवाहीमध्ये आदेशांच्या, न्यायनिर्णयांच्या प्रती/प्रमाणित प्रती मिळविण्यासाठी लागणारा खर्च व इतर किरकोळ खर्च.
- कायदेशीर कार्यवाहीमध्ये झालेला इतर खर्च, उदा खटल्याचे कागद–पुस्तक तयार करणे (ज्यामध्ये कागद, छपाई आणि कागदपत्रांचे भाषांतर सामील आहे) आणि त्यास अनुषंगिक इतर खर्च.

## विधी सेवा केव्हा परत घेतल्या जाऊ शकतात ?

- जर सहाय्यित व्यक्तिजवळ पुरेशी साधने उपलब्ध असतील तर ,
- जर सहाय्यित व्यक्तीने विधी सेवा लबाडीने अथवा कपटाने प्राप्त करुन घेतलेल्या असतील तर,
- जर सहाय्यित व्यक्ती विधी सेवा प्राधिकरण/समिती अथवा विधी सेवा पुरविणारे वकील यांच्याबरोबर सहकार्य करीत नसेल तर,
- जर त्या व्यक्तिने विधी सेवा प्राधिकरण/समिती यांनी नेमलेल्या विधी व्यवसायी व्यतिरिक्त इतर विधी व्यवसायीची नेमणूक केलेली असेल तर,
- जर सहाय्यित व्यक्तीचा मृत्यू झाला तर, ज्या दिवाणी खटल्यांमध्ये अधिकार किंवा दायित्व टिकून आहेत ते खटले सोडून.
- जर विधी सेवा प्राप्त करुन घेण्यासाठीचा अर्ज किंवा प्रश्नांकित विषय हे कायदेशीर प्रक्रिया किंवा विधी सेवा यांचा दुरुपयोग आहे असे आढळून आल्यास.

## विधी सेवा नाकारल्या गेल्या असल्यास अपील दाखल करता येते का ?जर येत असल्यास कोठे ?

- होय. प्राधिकरण/समिती यांचे अध्यक्ष यांच्याकडे विधी सेवा नाकारण्याच्या परिस्थितीमध्ये योग्य कालावधीत अपील दाखल करता येऊ शकते.

## तक्रारी किंवा सूचना दाखल करता येतात का? जर येत असल्यास कोठे?

- मोफत विधी सहाय्य आणि सेवांमध्ये सुधारणा करण्यासाठी अशा तक्रारी/सुचना यांचे स्वागतच केले जाते.
- तक्रारी/सूचना या सदस्य सचिव यांना संबोधित केल्या जाऊ शकतात किंवा पोस्टाने पाठविल्या जाऊ शकत

वाद उद्‌भवला तर तो शक्यतोवर सामंजस्याने सोडवावा ही आपली प्राचीन परंपरा गावातील जुनी जाणती माणसे एकत्र येत आणि कोणाहीमध्ये उद्‌भवलेला कुठल्याही स्वरुपाचा वाद समजुतीने मिटवीत ज्यांच्यापुढे वाद नेला जाई ते त्या गावातील आदरणीय आणि नि:पक्षपाती लोक असत. याचेच आधुनिक स्वरुप म्हणजे वैकल्पीक वाद निवारण दिवाणी प्रक्रीया संहिता सीपीसी च्या कलम ८९ अन्वये अभिप्रेत असणारे पर्यायी वाद निराकरण (एडीआर).

न्यायालयात लाखो प्रकरणे न्यायाच्या प्रतिक्षेत आहेत व त्यात दिवसें–दिवस भर पडत आहे. त्यामुळे न्यायालयाच्या कामाचा भार वाढत चालला आहे. न्यायालयातील प्रलंबित प्रकरणाची संख्या कमी करण्याकरीता दिवाणी प्रकीया संहिता सीपीसी च्या कलम ८९ अन्वये खालील प्रमाणे तडजोडीचे मार्ग अवलंबविण्याच्या प्रकारांचा समावेश केला आहे.

१. लवाद
२. समंन्वयक
३. लोकन्यायालय
४. मध्यस्थी

वैकल्पीक वाद निवारण म्हणजे दोन्ही पक्षांनी संमती दिलेल्या मध्यस्थिद्वारे वाद मिटविण्यासाठी तसेच पुढील होणारे वाद टाळण्यासाठी दोन्ही पक्षकाराना मान्य असेल अशा प्रकारच्या मध्यस्थिने दिलेल्या निवाडयावरील न्यायाधिशांचे आदेश तसेच कायदेशीर बांधिलकी देणा–या या विकसीत प्रक्रीयेला वैकल्पिक वाद (एडीआर) असे म्हणतात.

एखादया प्रकरणात तडजोडीयोग्य परिस्थिती असण्याचे दिसून येत असल्यास न्यायालयाने प्रथम अशा तडजोडीचे मुद्दे निश्चित करुन हे पक्षकारांना कळवावेत व त्यानंतर पक्षकरांकडून त्याबाबत खुलासा वा विश्लेषणे आल्यास न्यायालयास त्यानुसार पुन्हा संभाव्य तडजोडीचे मुद्दे निश्चित करुन १. लवाद २. समन्वय ३. लोकन्यायालय ४. मध्यस्थी यापैकी कोणत्या प्रकारे तडजोड होणे शक्य आहे त्या प्रमाणे तडजोड होण्यासाठी पाठविता येईल.

मध्यस्थ किंवा सुसंवादी व्यक्ती ही काळाच्या गरजेतून निर्माण झालेली व उभी राहू शकलेली व्यक्ती किंवा व्यक्तीसमूहांची व्यवस्था आहे. अशी व्यवस्था असण्याची काळाची गरज ओळखून दिवाणी प्रक्रिया संहितेमध्ये कलम ८९ मध्ये दुरुस्ती करणारा कायदा १९९९ मध्ये लोकसभेत संमत केला. या कायद्याने सुसंवाद समेट व सहमतीने लवाद यंत्रणेस एक कायदेशीर व्यवस्थेचे स्थान देण्यात आलेले आहे. न्यायालयात प्रलंबित किंवा न्यायालयाकडे वर्ग होऊ घातलेली प्रकरणे आता या व्यवस्थेकडे सोपवून सामंजस्याने व सौहार्दाने सोडवली जाऊ शकतात. त्यामुळे विधीवत मध्यस्थी हा उपाय आज केवळ एखादयाची खाजगी गरज राहीली नाही. तर राजाश्रय व विधीवतता असण्याची एक कायदेशीर चौकट त्यास प्राप्त झालेली आहे. मध्यस्थी किंवा सुसंवाद निर्मिती याला गरज म्हणून कायद्याचे वलय लाभलेले असले तरी त्याला कायद्याच्या चौकटीचा ताठरपणा नाही. कार्यसुलभतेकरीता अत्यंत लवचिक स्थळ, काळ व परिस्थितीनुसार बदल करता येतील अशी ही संकल्पना व त्यावर आधारित एक यंत्रणा आहे.

मध्यस्थीकरीता संदर्भित करण्यात येणा–या प्रकरणांमध्ये सर्व दिवाणी प्रकरणे ज्यात मनाई हुकुमाकरीता नुकसान भरपाई मालमत्तेची वाटणी, विनिदी पालनाकरीता आर्थिक दावे, भाडेसंबधी कारवाई करावयाची व कौटुंबीक वाद आणि बौध्दिक  संपदा अधिकार यासंबंधी किंवा धनादेश न वटणे अशी प्रकरणे परंतु ज्यात लबाडीचा गंभीर दोषारोप नाही, अशी प्रकरणे सोडून परकाम्य लेख अधिनियमाच्या कलम १३८ अंतर्गत प्रकरणे, भा.द.वि.च्या कलम ४०६/४९८ अ अंतर्गत असलेली फौजदारी प्रकरणे आणि ज्यात नियमानुसार समझोता करता येईल अशी प्रकरणे सुध्दा मध्यस्थीकरीता संदर्भित करता येतात.

**<u>मध्यस्थी समेट व लवाद या व्यवस्थेचे दूरगामी फायदे</u>**

१. न्यायालयीन कज्जांमधील निकालापेक्षा मानसिक दृष्टया आणि दृढतेच्या दृष्टीने अधिक समाधानकारक निकाल.

२. मतैक्य आणि मताभिन्नतेचे मुद्दे शोधून विवाद्य मुद्यांतील दरी कमी करणे.

३. याद्वारे कोणलाही.

१. समेटामध्ये जिंकणे, हरलो हा भाव न राहता सन्मानपूर्वक पाठविणे  (विन विन सिच्युएशन) असा असतो.

२. दुरावलेली माणसे अधिक न दुरावता पुन्हा स्नेहात बांधली जाण्याची शक्यता यामुळे खुप जास्त वाढते.

३. सामाजिक स्वास्थ सुधारणेस हया प्रक्रीयेमुळे नक्कीच मदत होते.

४. वादाचा निर्णय लवकर व मैत्रीपूर्ण वातावरणात होऊ शकतो

५. वादावरील खर्चाचा बोजा दोन्ही पक्षकारांवर खुप कमी होतो.

६. न्यायालयावरील कामाचा दबाव कमी होतो.

७. वेळेचा व्यय–अपव्यय टळतो व अधिक सकारात्मक कार्यासाठी तो वापरता येऊ शकतो.

८. हूकुमनाम्याची बजावणी व त्यातील पुढील कोर्टकचेरीतील वेळ व खर्च वाचतो.

९. प्रवास, वकील फी व अन्य खर्चाने बचत

१०. पक्षकारांचे ताणतणाव कमी होऊन प्रकृती स्वास्थ व कौटुंबिक सौहार्दात वाढ होईल.

११. न्यायालयातील वेळ वाचून देशाच्या आर्थिक विकासास हातभार लागेल.

१२. अपील, रिव्हिजन, वरिष्ठ कोर्टात दाद  मागणे इत्यादीमधील श्रम व खर्च टळेल

१३. आपल्यावर निर्णय लादला गेला ही भावना रहात नाही.

१४. समेटातील सर्व चर्चा गुप्त ठेवली जाते व चर्चेसमयी झालेला संवाद कबुली किंवा अन्य प्रकारे न्यायालयात एकमेकांविरुध्द वापरता येणार नाहीत.

१५. समेट होऊ शकत नाही अशी प्रकरणे हाताळण्यास न्यायालयात पुरेसा वेळ देता येईल.

१६. सामाजिक स्वास्थ व नैतिकता वाढीस मदत होईल.

१७. तरुण किंवा नवीन क्षेत्रात प्रवेश करु शकणाऱ्या व्यक्तींना  व्यवसाय ही एक उदयोन्मूख व कसदार आणि आकर्षक व्यवसायाची संधी आहे.

१८. ए.डी.आर च्या माध्यमातून निकाली होणाऱ्या खटल्यांमध्ये भरलेली संपूर्ण कोर्ट फी परत मिळते.

१९. भांडणातून मिळणारा आनंद फार निकृष्ट आहे, त्याऐवजी आयुष्याचा खरा आनंद उपभोगण्याची संधी पक्षकारांना मिळेल.

## लोकन्यायालय म्हणजे काय?

वाद उद्‌भवला तर तो शक्यतोवर सामंजस्याने सोडवावा ही आपली प्राचीन परंपरा. गावातील जुनी–जाणती माणसे एकत्र येत आणि कोणाही मध्ये उद्‌भवलेला कुठल्याही स्वरुपाचा वाद समजुतीने मिटवित. ज्यांच्यापुढे वाद नेला जाई ते त्या गावातील आदरणीय आणि नि:पक्षपाती लोक असत. यालाच 'गाव–पंचायत' असे म्हणत. सध्याचे 'लोकन्यायालय' म्हणजे या गाव पंचायतीचेच आधुनिक रुप. जेथे कायदा जाणणाऱ्या नि:पक्षपाती लोकांचे न्यायमंडळ त्यांच्यापुढे येणाऱ्या प्रकरणांमध्ये सामंजस्याने न्याय्य तडजोड घडविते.

## लोकन्यायालये कोठे भरविली जातात?

लोकन्यायालये राज्यातील सर्व न्यायालयांमध्ये नियमितपणे भरविली जातात. प्रत्येक जिल्हयाच्या वा तालुक्याच्या ठिकाणी दोन महिन्यातून किमान एकदा व आवश्यकता भासल्यास त्याहून अधिक वेळा योग्य त्या सूचना देऊन त्या–त्या न्यायालयामध्ये लोकन्यायालयाचे आयोजन केले जाते. जिल्हयाच्या ठिकाणी होणारी लोकन्यायालये जिल्हा न्यायालयात तर तालुक्याच्या ठिकाणी होणारी लोकन्यायालये तालुका कोर्ट परिसरात भरविली जातात. उच्च न्यायालयामध्ये मुंबई येथे तसेच नागपूर आणि औरंगाबाद खंडपीठाचे ठिकाणी देखील लोकन्यायालये भरविली जातात. महाराष्ट्रातील जवळपास सर्व जिल्हयांमध्ये व तालुक्याच्या ठिकाणी कायम व अखंडित लोकन्यायालये स्थापित झाली आहेत. तेव्हा दर दोन महिन्यांनी अथवा विशिष्ट कालांतराने होत असलेल्या लोकन्यायालयाची वाट पहाण्याचीही आवश्यकता नाही. तुमचा वाद आपसात समजुतीने सोडविण्याची तुमची इच्छा असल्यास तुम्ही केव्हाही या कायम व अखंडित (Permanent & Continuous) लोकन्यायालयापुढे जाऊ शकता.

## लोकन्यायालयाचे आयोजन कोण करते?

लोकन्यायालयाचे आयोजन विधी सेवा प्राधिकरणांमार्फत केले जाते. राज्य व जिल्हा विधी सेवा प्राधिकरणे, तालुका विधी सेवा समित्या व उच्च न्यायालय विधी सेवा समिती याद्वारा विधी सेवा प्राधिकरण अधिनियम, १९८७ मधील तरतूदी अंतर्गत लोकन्यायालयांचे वेळोवेळी आयोजन केले जाते. लोक न्यायालयाची तारीख सामान्यत: एक महिना अगोदर जाहीर केली जाते.

## लोकन्यायालयांची रचना कशी असते?

लोकन्यायालय देखील एकाअर्थी कोर्टच असते. उलटपक्षी कोर्टात जेथे तुमच्या खटल्याच्या निवाडयासाठी एकच न्यायाधीश असतात तथे लोकन्यायालयात किमान तीन जाणकार व्यक्तींचे पॅनेल न्यायाधीशांची भूमिका बजावते. कार्यरत अथवा निवृत्त ज्येष्ठ न्यायाधीश पॅनेलचे प्रमुख म्हणून तर अनुभवी वकील अथवा कायदयाच्या जाणकार व्यक्ती सदस्य म्हणून लोकन्यायालयाचे काम पहातात.

## लोकन्यायालयापुढे कुठले खटले येतात?

लोकन्यायालयामध्ये दिवाणी व फौजदारी दोन्ही स्वरुपाची प्रकरणे समेटासाठी येऊ शकतात. मोटार अपघात व भूसंपादन नुकसान भरपाईचे दावे, बँका व अन्य वित्तिय संस्थांचे वसुलीचे दावे, वैवाहिक संबंधातील

वाद, निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टच्या कलम १३८ खाली दाखल झालेली प्रकरणे वगैरेसाठी स्वतंत्ररित्या खास लोकन्यायालये आयोजित केली जातात. वरील प्रकारात मोडणारी न्यायालयात प्रलंबित असलेली प्रकरणे तर लोकन्यायालयात घेता येतातच शिवाय कोर्टात दाखल न झालेली प्रकरणे देखील (Pre-Litigation) लोकन्यायालयापुढे समेटासाठी येऊ शकतात व त्याबाबत देखील लोकन्यायालयात निवाडा होऊ शकतो. म्हणजेच तुमचा वाद तुम्ही कोर्टात प्रकरण दाखल करण्याअगोदर देखील लोकन्यायालयासमोर नेऊन त्याचा निवाडा करुन घेऊ शकता.

## लोकन्यायालयासमोर दावा कसा येऊ शकेल?

ज्या न्यायालयात आपला खटला प्रलंबित आहे तेथे एक साधा अर्ज देऊन केसच्या कुठल्याही टप्प्यावर आपण आपला खटला लोकन्यायालयापुढे नेऊ शकतो. असा अर्ज आल्यावर न्यायाधीश दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकून घेतात व दाव्यातील वाद आपसात समजूतीने मिटू शकेल असे मत झाल्यास प्रकरण लोकन्यायालयापुढे ठेवण्याचा आदेश करतात. दावा व कैफियतीतील कथनांवरुन संबंधित न्यायाधीशांना प्रकरणाची आपसात समजुतीने मिटण्याची शक्यता वाटली तर कुठल्याही पक्षाचा अर्ज नसला तरी न्यायाधीश स्वतःहून खटला लोकन्यायालयाकडे वर्ग करु शकतात.

## लोकन्यायालयाचे कामकाज कसे चालते?

जाहीर झालेल्या तारखेस नेमलेल्या ठिकाणी लोकन्यायालयाचे पॅनेल कामकाजास सुरुवात करते. लोकन्यायालयात त्या दिवशी सुनावणीसाठी घ्यावयाच्या खटल्यांची यादी पूर्वीच जाहीर झालेली असते. त्यातील खटले अनुक्रमे लोकन्यायालयासमोर सुनावणीसाठी घेण्यात येतात. लोकन्यायालयासमोर पक्षकार स्वतः अथवा वकीलांमार्फत त्यांची बाजू मांडू शकतात. आवश्यकता भासल्यास लोकन्यायालय आवश्यक ती माहिती संबंधितांकडून पुराव्याच्या स्वरुपात मागवू शकतात. खटल्यांची सर्व कागदपत्रे मूळ स्वरुपातच लोकन्यायालयापुढे असतात व पॅनेल सदस्य त्यांची योग्य ती दखल नेहमीच घेऊ शकतात. दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकल्यावर पॅनेल सदस्य दोघांनाही समेटासाठी योग्य पर्याय देखील सुचवित असतात. पॅनेल सदस्य तटस्थपणे काम करीत असल्याने बहुतांश वेळा त्यांच्या सूचनांचा पक्षकारांकडून आदर केला जातो व त्यानुसार समेट घडून येतात. ज्या अटी व शर्तीवर आपसात समझोता होतो त्या लगेचच लेखी स्वरुपात उतरविण्यात येतात व दोन्ही पक्षकार आणि त्यांचे वकील त्या खाली सहया करतात. तद्नंतर लोकन्यायालयाचे पॅनेल सदस्य देखील त्या खाली आपल्या सहया करतात. अशा प्रकारे लोकन्यायालयाचा निवाडा तयार होतो.

## लोकन्यायालयाच्या निवाडयाची अंमलबजावणी कशी होते?

लोकन्यायालयात होणारा निवाडा म्हणजे कोर्टाचा पक्का हुकूमनामाच. लोकन्यायालयापुढे पक्षकार जी आपसात समजूत करतात किंवा आपसात समजूतीचा जो मसूदा तयार करतात त्याचेच रुपांतर लोकन्यायालयाच्या निवाडयात होते. कोर्टाच्या हुकूमनाम्याची व्हावी तशीच अंमलबजावणी लोकन्यायालयात झालेल्या निवाडयाची करता येते आणि त्याहून महत्वाचे म्हणजे लोकन्यायालयात होणारा निवाडा हा अंतिम असतो. त्या विरुध्द अपील करता येत नाही. तुमच्यातील भांडणाला पूर्ण विराम मिळतो आणि कोर्टबाजीतून तत्क्षणी तुमची सुटका होते.

## लोकन्यायालयात समेट झाला नाही तर काय?

समजा काही कारणास्तव तुमचा वाद लोकन्यायालयात मिटू शकला नाही तर तुमचा दावा संबंधित कोर्टाकडे परत जातो व प्रचलित न्याय पध्दतीप्रमाणे दाव्यासंदर्भातील दरम्यानचे काळात तात्पुरती थांबलेली कारवाई पुढे सुरु होते. दावा कोर्टात दाखल करण्यापूर्वी लोकन्यायालयापुढे आणला असेल (Pre-Litigation) व त्याचा निवाडा होऊ शकला नाही तर कोर्टात केस दाखल करण्याचा मार्ग मोकळा राहतोच. लोकन्यायालयासमोर तुम्ही काही तडजोडीचा प्रस्ताव दिला असला तरी तो मूळ केसच्या रेकॉर्डवर कुठेही येत नाही व दाव्याच्या गुणवत्तेच्या आधारे निकाली होण्याच्या प्रक्रियेवर त्याचा काहीही अनुकूल अथवा विपरीत परिणाम होत नाही.

सारांश – लोकन्यायालयापुढे येण्यात नुकसान काहीच नाही.

## लोकन्यायालयाबाबत माहिती कोठे मिळेल?

उच्च न्यायालयात आयोजिल्या जाणा–या लोकन्यायालयाची माहिती मुंबई येथे उच्च न्यायालय विधी सेवा समिती १०४ पी.डब्ल्यू.डी. बिल्डिंग, उच्च न्यायालय, फोर्ट, मुंबई–३२ येथे तर नागपूर आणि औरंगाबाद खंडपीठांसाठी त्या त्या ठिकाणच्या उच्च न्यायालय विधी सेवा उपसमितीकडे मिळेल. जिल्हा व तालुका न्यायालयांमध्ये होणाऱ्या लोकन्यायालयांची माहिती त्या त्या जिल्हा व तालुका न्यायालयामध्ये कार्यरत असलेल्या जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व तालुका विधी सेवा समित्यांच्या कार्यालयांकडून मिळेल.

"लोकन्यायालयात वाद मिटे,<br>
टिकून राही सन्मान,<br>
वेळ–पैसा दोन्ही वाचे,<br>
शिवाय मिळे समाधान

## लोकन्यायालयाचे फायदे"

१. केसचा झटपट निकाल लागतो. तोंडी पुरावा–उलटतपासणी–दीर्घ युक्तिवाद या बाबी टाळल्या जातात.

२. लोकन्यायालयाच्या निवाडयाविरुध्द अपील नाही. एकाच निर्णयात कोर्टबाजीतून कायमची सुटका होते.

३. लोकन्यायालयात होणारा निवाडा हा आपसात समजुतीने होत असल्याने ना कोणाचा जय होतो ना कोणाची हार.

४. लोकन्यायालयाचा निवाडा दोन्ही पक्षांना समाधान देतो.

५. परस्पर संमतीने निकाल होत असल्याने एकमेकातील द्वेष वाढत नाही व कटूताही निर्माण होत नाही.

६. कोर्टाच्या हुकूमनाम्याप्रमाणेच लोकन्यायालयात होणाऱ्या निवाडयाची अंमलबजावणी कोर्टामार्फत करता येते.

७. वेळ आणि पैसा दोघांचीही बचत होते.

८. लोकन्यायालयात निकाली निघणाऱ्या प्रकरणांमध्ये कायदयानुसार कोर्ट फी ची रक्कम परत मिळते.

## मध्यस्थी – एक प्रक्रिया – एक उद्दीष्ट

न्यायालयामध्ये असलेले मध्यस्थी केंद्र म्हणजे जलद न्यायदानाकरीता पर्यायी वाद निराकरण यंत्रणेस उत्तेजन देण्याचा एक प्रयत्न होय. मध्यस्थी म्हणजे दिवाणी प्रक्रिया संहिता (C.P.C.) च्या कलम ८९ अन्वये अभिप्रेत असणारे पर्यायी वाद निराकरण (A.D.R.) चाच एक भाग म्हणजेच पारंपारिक न्यायदान यंत्रणेचे पर्यायी स्वरुप होय. ऐच्छिक वाद निराकरण, अशी कार्य पध्दती असलेल्या या प्रक्रियेत, विवादक पक्षकारांना एकत्र आणून त्यांच्यात परस्पर संमतीने समझोता घडवून आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या तटस्थ व्यक्तीचा सहभाग असतो. मुंबई उच्च न्यायालय मध्यस्थी केंद्र, हे दिवाणी प्रक्रिया संहीतेच्या कलम ८९ मधील ध्येय व उद्देश्यांना अंमलात आणण्याकरीता, एक प्रकल्प होय आणि वकील वर्गाच्या पाठींब्याने तो राबविण्याचे अपेक्षित आहे.

न्याय मिळणे सुकर व्हावे तसेच न्यायालयातील प्रलंबित प्रकरणांची संख्या कमी व्हावी, यादृष्टीने परिणामकारक वाद निराकरण कार्यपध्दती अंमलात आणण्याकरिता, मध्यस्थी केंद्राच्या स्थापनेच्या दृष्टीने, मुंबई उच्च न्यायालयाने नागपूर, अकोला, नांदेड, औरंगाबाद, नाशिक, अहमदनगर, रत्नागिरी, मुंबई, पुणे आणि कोल्हापूर या सारख्या १० जिल्ह्यांची प्रयोगिक तत्वावर निवड केलेली होती. आता महाराष्ट्रातील सर्व न्यायालयात मध्यस्थी केंद्र स्थापन करण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत.

## मध्यस्थी म्हणजे काय ?

मध्यस्थी म्हणजे हस्तक्षेप प्रक्रियेचा एक भाग, ज्यात एक तटस्थ व्यक्ती म्हणजे मध्यस्थ, जो विवादक पक्षकारांमध्ये असणारा तंटा परस्पर संमतीने सोडविण्याकरिता मदत करतो. मध्यस्थी, ही गोपनीय, ऐच्छिक परस्पर सहभाग असणारी अशी प्रक्रिया असून ज्यात निःपक्षपाती आणि तटस्थ तिऱ्हाईत व्यक्ती विवादकांना त्यांच्या परस्पर संमतीने त्यांची तक्रार व भावना मांडण्याची व व्यक्त करण्याची संधी मिळते, आणि त्यानंतर त्यांच्या असाध्य परिस्थितीवर आणि मागण्यांवर तोडगा काढण्याची संधी प्राप्त होते. मध्यस्थ कोणताही तोडगा थोपवत नाही, तर पक्षकारांनी त्यांच्यातील तंटा सामोपचाराने सोडवता यावा याकरीता अनुकूल परिस्थिती निर्माण करतो.

**मध्यस्थी म्हणजे :**

- संरचनात्मक, अनौपचारिक वाटाघाटी प्रक्रिया
- अशी प्रक्रिया ज्यात तटस्थ असा मध्यस्थ विशेष विशेषीकृत संवाद व चर्चा तंत्राचा वापर करतो.
- विवादकांना त्यांच्यामधील तंटा मिटविण्याकरीता सहाय्य करणारी अशी ऐच्छिक, गोपनीय, पारदर्शी आणि लवचिक प्रक्रिया.

**मध्यस्थीकरीता संदर्भित करण्यात येणारी प्रकरणे :**

सर्व दिवाणी प्रकरणे ज्यांत मनाई हुकूमाकरिता, नुकसान भरपाई, मालमत्तेची वाटणी, विनिर्दीष्ट पालनाकरीता, आर्थिक दावे, भाडेसंबंधी कारवाई करावयाची व कौटुंबिक वाद आणि बौध्दिक संपदा अधिकार यासंबंधी किंवा धनादेश न वटणे, अशी प्रकरणे परंतु, ज्यात लबाडीचा गंभीर दोषारोप

नाही, अशी प्रकरणे सोडून, परक्राम्य लेख अधिनियमाच्या कलम १३८ अंतर्गत प्रकरणे, भा.द.वि. च्या कलम ४०६/४९८-अ अंतर्गत असलेली योग्य फौजदारी प्रकरणे आणि ज्यांत नियमानुसार समझोता करता येईल अशी प्रकरणेसुध्दा मध्यस्थीकरीता संदर्भित करता येतील.

## मध्यस्थीकरीता अर्ज कसा करता येईल ?

दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम ८९ मध्ये स्पष्टपणे मांडले आहे की, एखाद्या प्रकरणात सामोपचाराने तंटा मिटविण्याचा जराही वाव असल्यास, पीठासीन अधिकारी सदर प्रकरण पर्यायी वाद निराकरणाकडे संदर्भित करु शकतील. दोन्हीही पक्षकार समझोता करण्यास कबूल नसतील, परंतु, त्यांची मध्यस्थीच्या माध्यमाने समेटाची शक्यता शोधण्याची प्रामाणिक इच्छा असल्यास, अशावेळी सुध्दा मध्यस्थीकडे संदर्भित करणे योग्य आहे, आणि जर पीठासन अधिकाऱ्यास तसे करणे योग्य वाटल्यास, प्रकरण मध्यस्थीकरीता मध्यस्थी केंद्राकडे संदर्भित केले जाईल.

## मध्यस्थी पध्दतीत काय केले जाते ?

मध्यस्थीची प्रक्रिया अनौपचारिक पण संरचनात्मक प्रक्रिया आहे, ज्यांत अनेक टप्प्यांचा समावेश होतो, त्यापैकी टप्पे खालीलप्रमाणे :-

१. ओळख - मध्यस्थी तिचि/त्याची ओळख पक्षकारांना करुन देते/देतो व मध्यस्थी प्रक्रियेची माहिती समजावून सांगतो व तटस्थता आणि गुप्ततेची खात्री देतो. तो (मध्यस्थ) मूळ (सर्वसाधारण) नियम समजावून सांगतो आणि शेवटी समेटाकरीता मुक्त वातावरणातील चर्चेकरीता चालना देतो.

२. संयुक्त बैठक - मध्यस्थ खऱ्या पार्श्वभूमीची व पक्षकारांच्या हितासंबंधीची माहिती गोळा करतो, त्यांच्यामधील संवाद प्रस्थापित करतो आणि त्यांच्यामधील वाद संदर्भात सामोपचाराने समेट घडून यावे या करीता अनुकूल वातावरण निर्माण करतो.

३. व्यैयक्तिक (विलग) बैठक - यांत मध्यस्थी पक्षकारांना त्यांच्या तक्रारी, मागण्या, अपेक्षा विस्तृतपणे सांगण्यास मुभा देतो आणि पक्षकारांना गोपनीय माहिती प्रकट करण्यासाठी त्यांचे मन वळवित असतांनाच, पुढे आणखी माहिती गोळा करण्याचे कार्य चालू ठेवतो, आणि पक्षकारांद्वारा किंवा मध्यस्थीद्वारा सामोपचाराने समेट घडण्यासाठी शोधून काढलेल्या पर्यायांची निवड करण्यास मदत करतो.

४. करार (संमत) - मध्यस्थ समेटाच्या अटींवर शिक्कामोर्तब करुन त्यांची स्पष्टता व्यक्त करतो आणि पक्षकारांना स्विकार्य असेल त्याप्रमाणे समेटाच्या अटींची स्पष्टपणे, मुद्देसूद आणि ठोसपणे नोंद करतो.

## मध्यस्थी प्रक्रियेला लागणारा कालावधी

अनेक प्रकरणे दोन-एक बैठक सत्रात सोडविली जातात. परंतु, काही किचकट वाद प्रकरणात परिणामकारक निराकरणाकरीता अधिक सत्रांची गरज लागू शकते. अगोदरच्या बैठक सत्रानंतर एका आठवडयात पाठपुरावा बैठक सत्र असणे इष्ट आहे. परंतु, सर्वसाधारणपणे मध्यस्थ प्रक्रियेकरीता अधिकतम ६० दिवसांचा कालावधी असावा. मध्यस्थांनी तहकूबीची विनंती सहजपणे मान्य करु नये.

पक्षकार किंवा सामोपचाराने समेट करण्यासाठी प्राधिकृत केलेले प्रतिनिधी, त्यांच्या

समुपदेशीसह मध्यस्थी प्रक्रियेत भाग घेऊ शकतात. मध्यस्थीकडे प्रकरण संदर्भित केल्याने, कोणतीही न्यायालयीन कार्यवाही आपोआप थांबत नाही.

## मध्यस्थी म्हणून कोण असू शकतात ?

दिवाणी प्रक्रिया मध्यस्थी नियमावली, २००६ च्या नियम (४) मध्ये विहीत केल्यानुसार –

(अ) (१) भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती,

(२) उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती

(३) निवृत्त जिल्हा आणि सत्र न्यायाधीश किंवा नगर दिवाणी न्यायालय किंवा तत्सम दर्जाच्या न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश

(ब) सर्वोच्च न्यायालयाच्या किंवा उच्च न्यायालय किंवा जिल्हा न्यायालय स्तरावर निम्नतम १५ वर्षे वकीली व्यवसायाचा अनुभव असणारे वकील

(क) कमीत कमी १५ वर्षांचा अनुभव असणारे तज्ञ किंवा इतर व्यवसायी किंवा निवृत्त वरिष्ठ नोकरशाहीतील अधिकारी किंवा निवृत्त वरिष्ठ कार्यकारी अधिकारी.

(ड) अशा संस्था, ज्या मध्यस्थी प्रक्रियेत तज्ञ आहेत आणि ज्या उच्च न्यायालयाद्वारे मान्यता प्राप्त आहेत. परंतु, त्यांच्या सदस्यांच्या नावांना आरंभी किंवा ज्या ज्या वेळी सदस्यत्वांमध्ये बदल झाला आहे, त्यावेळी उच्च न्यायालयाकडून मान्यता मिळाली आहे अशी संस्था.

### मध्यस्थी पध्दतीचे फायदे

- न्यायालयीन कब्जांमधील निकालांपेक्षा, मानसिक दृष्ट्या आणि दृढतेच्या दृष्टीने अधिक समाधानकारक निकाल.
- मतैक्य आणि मतभिन्नतेचे मुद्दे शोधून, विवाद्य मुद्यांतील दरी कमी करणे.
- याद्वारे कोणत्याही विवादातील पक्षकारांना त्यांची मते, दृष्टीकोन प्रत्यक्षपणे, अनोपचारिकपणे, गोपनीयतेने आणि सूडाच्या भितीशिवाय मांडता येतात, तसेच मध्यस्थी प्रक्रिये दरम्यान केलेले निवेदन, समझोता न झाल्यामुळे पक्षकाराविरुध्द पुढे कोणत्याही न्यायालयात वापरता येत नसल्यामुळे, त्यात मनमोकळेपणा असतो, जी गोष्ट उत्साहवर्धक आहे.
- ज्यामुळे, वेळ, पैसा आणि शक्तीची बचत होण्यास मदत होते, कारण मध्यस्थी माध्यमाद्वारा वादाचे निराकरण, खटल्या अगोदर किंवा खटल्यादरम्यान किंवा अपिलातील न्यायनिर्णया अगोदर कोणत्याही वेळी करता येते.
- पक्षकारांच्या बरोबर किंवा चुकीच्या गोष्टींपेक्षा त्यांच्या भवितव्यावर भर दिला जातो.
- न्यायालयीन कब्ज्यांच्या भितीचे निवारण.
- तणावातून मुक्तता आणि मानसिक शांतीची पुनःप्राप्ती.
- यामुळे दोन्ही पक्षकारांमधील वैरभाव कमी होतो आणि ज्यामुळे त्यांना त्यांचा व्यवसाय / धंदा व वैयक्तिक संबंध पुनःप्रस्थापित होण्यास व टिकवून ठेवण्यास संधी प्राप्त होते.
- ज्यामुळे विवादकांमध्ये विजयी झाल्याची परिस्थिती निर्माण होते.

# गर्भधारणापूर्व आणि प्रसवपूर्व निदान तंत्र (गर्भ लिंग निवड प्रतिबंध) कायदा १९९४

मनुष्य हा पृथ्वीवरील सर्वात हुशार मानला जाणारा प्राणी आहे. माणसाने प्रत्येक क्षेत्रात आपल्या बुध्दीचा वापर करुन प्रगती केलेली आहे. विशेषता तंत्रज्ञानामध्ये विलक्षणीय प्रगती साधली आहे. माणसाने ज्यावेळेस वेगवेगळया क्षेत्राकरीता तंत्रज्ञानाचा शोध लावला त्या त्या वेळेला तंत्रज्ञानाचा वापर चांगल्या बरोबरच वाईट गोष्टी करीता होत असल्याचे आपणास दिसते. या ठिकाणी विशेषता वैद्यकीय तंत्रज्ञानाच्या बाबतीत बोलायचे झाले तर सोनोग्राफी तंत्राचा शोध हा माणसाने वैद्यकीय क्षेत्रात रोग्यांवर योग्य इलाज व्हावा या उद्देशाने लावला परंतु सध्या या सोनोग्राफी तंत्रज्ञानाचा वापर अल्ट्रासाउंड सोनोग्राफीने गर्भलिंग जाणून घेण्यासाठी सर्वात जास्त वापरलं जात आहे.

भारतामध्ये सध्या लोकसंख्येतील स्त्री पुरुष संख्येचा समतोल ढासळत आहे याचे मुख्य कारण म्हणजे अल्ट्रासाउंड सोनोग्राफीमार्फत होणारी गर्भलिंग निदान चिकित्सा. आपल्याकडे पुरुषप्रधान संस्कृती इतकी खोलवर रुजलेली आहे की आजदेखील प्रत्येकाला आपल्याला मुलगा हवा कारण मुलगा म्हणजे वंशाचा दिवा व म्हातारपणाचा आधार आहे व मुलगी नको का?तर मुलगी परक्याचे धन आहे. अशी समाजाची मानसिकता आहे.

आपल्या पोटी मुलगाच यावा या हव्यासापोटी सोनोग्राफीद्वारे गर्भातील बालक मुलगा आहे की मुलगी आहे हे लोक पाहू लागले. वास्तविक लिंगनिदान करणे हा कायदयाने गुन्हा आहे हे माहित असूनही डॉक्टर्स व पालक यांच्या संगनमताने हे गुपचुपपणे चालू शकते. प्रसवपूर्व निदान तंत्राच्या दुरुपयोगाला आळा घालून स्त्रिलिंग गर्भाची हत्या थांबविण्याचा सन १९९४ पासून संपूर्ण देशभर प्रसवपूर्व निदान तंत्र दुरुपयोग प्रतिबंध अधिनियम लागू केला.

**<u>गर्भलिंग चाचणी प्रतिबंध कायदा : १९९४</u>**

**<u>कायदयाचा उद्देश :</u>**

- गर्भधारणेपूर्वी वा नंतर गर्भाचे लिंग ओळखण्यासाठी वैद्यकीय तंत्रज्ञानाद्वारे करण्यात येणा–या सर्व प्रकारच्या चाचण्यांवर बंदी करणे.
- हा या कायद्याचा मुख्य उद्देश आहे जेणे करुन मुलीच्या जन्माआधीच भ्रूणहत्येच्या प्रथेस आळा घातला जाईल.
- मात्र अशा वैद्यकीय तंत्रज्ञानाद्वारे गर्भातील जैविक गुणदोष, आजारांबद्दलच्या माहितीसाठी केलेल्या चाचण्यांचे नियमन या कायद्याद्वारे केले गेले आहे.

**<u>गर्भलिंग चाचणी म्हणजे काय?</u>**

- गर्भलिंग परिक्षण, अल्ट्रा सोनोग्राफी, रक्तचाचणी किंवा इतर अशी कोणतीही चाचणी, ज्यामुळे गर्भाचे लिंग ओळखणे शक्य होईल.

## अपराध व शिक्षा

- कोणत्याही व्यक्तीने किंवा विशेष तज्ञाने वा तज्ञाच्या गटाने स्त्री किंवा पुरुषाची वा दोघांची चाचणी करुन गर्भधारणेपूर्वी वा नंतर गर्भाच्या लिंगाचे परिक्षण करणे गुन्हा असून त्यासाठी प्रथम वेळेस तीन वर्षापर्यंत कैद व दहा हजार रुपये दंड तर नंतरच्या प्रत्येक गुन्हयांसाठी पाच वर्षापर्यंत कैद व पन्नास हजार रुपयेपर्यंत दंड ही शिक्षा.
- गुन्हेगार नोंदणीकृत वैद्यकीय अधिकारी असल्यास हया गुन्हयाच्या खटल्याचा निकाल लागेपर्यंत त्यांची नोंदणी रद्द होईल. गुन्हा सिध्द झाल्यास प्रथमवेळेस त्याची नोंदणी ५ वर्षासाठी तर दुसऱ्या वेळेस नेहमीसाठीच रद्द करण्यात येईल.
- गर्भलिंग चाचणी करण्यासंबंधी प्रत्यक्षरित्या वा अप्रत्यक्षरित्या प्रसार करणे गुन्हा आहे. त्यासाठी संबंधित व्यक्तीला तीन वर्षापर्यंत कैद व दहा हजार रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो.
- जी व्यक्ती गर्भाचे लिंग ओळखण्यासाठी गर्भलिंग चाचणी करुन घेण्यास कोणत्याही दवाखान्याची, केंद्राची किंवा प्रयोगशाळेची मदत घेते म्हणजे गर्भ मुलीचा असला तर गर्भपात करता यावा. त्या व्यक्तीस प्रथम वेळेस तीन वर्षे कैद, पन्नास हजार रुपयापर्यंत दंड तर नंतरच्या प्रत्येक गुन्हयासाठी पाच वर्षापर्यंत कैद व एक लाख रुपयापर्यंत दंड होऊ शकतो
- गर्भचाचणी करण्याचे कोणतेही तंत्रज्ञान वा यंत्र बेकायदेशीररित्या विकणे व विकत घेणे गुन्हा आहे.
- कोणत्याही स्त्रीला जबरदस्ती करुन गर्भलिंग चाचणी करावयास लावणाऱ्या व्यक्तीला शिक्षा होईल. मात्र त्या स्त्रीला गुन्हेगार मानण्यात येणार नाही.
- कायद्याचे उल्लंघन कंपनीने केले असल्यास, गुन्हयास जबाबदार प्रत्येक व्यक्तीस व कंपनीतील उच्च अधिकाऱ्याविरुध्द (त्याने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष गुन्हा केला असेल तरी) गुन्हे दाखल केले जातील.
- हया कायद्याच्या उल्लंघनासाठी जर विशिष्ट शिक्षा नमूद नसेल तर त्या गुन्हयासाठी संबंधित व्यक्तीला तीन महिन्यापर्यंत कैद व एक हजार रुपयांपर्यंत दंड शिक्षा होईलच पण गुन्हा उघड झाल्यावरही गुन्हा करणे सुरुच असल्यास प्रत्येक दिवसाला पाचशे रुपयांप्रमाणे अतिरिक्त दंड आकारला जाईल.
- कायद्यांतर्गत सर्व गुन्हे दखलपात्र व अजामीनपात्र आहेत.
- गुन्हयाची तक्रार स्वत:पिडीत व्यक्तीला वा तिच्या नातेवाईकाला केंद्र सरकार किंवा राज्य सरकारने नियुक्त केलेल्या समितीकडे लेखी स्वरुपात करावी लागते किंवा जर सामाजिक संस्थेने अशा समितीकडे गुन्हयाची तक्रार केली व जर त्या समितीने पंधरा दिवसांत योग्य ती कार्यवाही केली नाही, तर ती सामाजिक संस्था थेट प्रथमवर्ग दंडाधिकारी न्यायालयात गुन्हयाची तक्रार करु शकते.

## गर्भाच्या इतर चाचण्यांबद्दल :

- नोंदणीकृत वैद्यकीय तज्ञाला वैद्यकिय प्रयोगशाळेस खालील रोगासंबंधी निदान करण्यासाठी गर्भ चाचणी करता येते—

१. गुणसूत्रातील दोष
२. लिंगासंबंधीचे जनुकिय दोष
३. वंशपरंपरागत रोगनिदान
४. या कायद्यांतर्गत स्थापन केलेल्या समितीने मान्यता दिलेले **इतर आजार/दोष**

परंतु अशी गर्भचाचणी करण्यापूर्वी खालीलपैकी एका अटीची पूर्तता करणे आवश्यक असून

त्यासंबंधी लेखी पत्र देण्याची जबाबदारी चाचणी करणाऱ्या वैद्यकीय तज्ञांवर आहे.

**अटी :**

१. गर्भवती महिलेचे वय किमान ३५ वर्षे असावे.
२. नैसर्गिकरित्या दोन वा जास्त वेळा गर्भपात झाल्यास
३. गर्भवती महिलेस रासायनिक भौतिक वा इतर कारणांमुळे बाधा झाल्यास
४. गर्भवती महिलेस, तिच्या पतीस किंवा त्यांच्या कुटुंबात कोणालाही जनुकिय गुणसूत्र आजार असल्यास.

**इतर :**

- अशी चाचणी करण्यापूर्वी फक्त त्या स्त्रीची परवानगी आवश्यक आहे तिला इतर नातेवाईक त्यासाठी जबरदस्ती करु शकत नाहीत वा फक्त त्यांच्या परवानगीने चाचणी करता येत नाही.
- जो तज्ञ गर्भचाचणी करतो त्याला संबंधित स्त्री वा तिच्या नातेवाईकाला गर्भाच्या लिंगासंबंधी माहिती कोणत्याही भाषेत, चिन्हाने, खूणेने प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्यासुध्दा देण्यास प्रतिबंध आहे.
- चाचणी करण्यापूर्वी स्त्रीला समजेल अशा भाषेत त्या चाचणीबद्दल संपूर्ण माहिती, त्यामुळे होणारे परिणाम सांगून तिची लेखी नमुनापत्रावर सही घेऊन परवानगी घेणे वैद्यकीय तज्ञावर बंधनकारक आहे.
- ज्या स्त्रीची गर्भलिंग चाचणी करण्यात आली आहे, तिने स्वखुषीने ही चाचणी करु दिली, हे पुराव्यानिशी सिध्द होईस्तोवर, तिच्यावर नातेवाईकाने वा पतीने जबरदस्ती केली असे न्यायालय गृहीत धरेल.
- २००२ नंतर गर्भचाचणी तंत्रज्ञान जनुकिय जैविक दवाखाने, प्रयोगशाळा उघडण्यासाठी सरकारकडे अधिकृत नोंदणी करणे आवश्यक आहे.
- इस्पितळे, जैविक केंद्र व प्रयोगशाळांना त्यांनी केलेल्या सर्व प्रकारच्या गर्भचाचण्यांची माहिती रजिस्टरमध्ये ठेवणे जरुरीचे आहेच व मागच्या दोन वर्षापर्यंतची पूर्ण माहिती उपलब्ध असणेही बंधनकारक आहे.

**कायद्याच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी नेमलेल्या समित्या:**

**केंद्रीय व्यवस्थापन समिती :**

१. सरकारला गर्भचाचणी तंत्रज्ञान उपयोगासंबंधी सल्ले देणे
२. या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी काळानुरुप दुरुस्त्या सुचविणे
३. वैद्यकीय तज्ञ, जनुकिय तज्ञ व प्रयोगशाळांनी या तंत्रज्ञानाचा वापर करण्याबाबतचे नियम करणे

राज्य समिती :

तसेच राज्यपातळीवर कायद्याच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी शासनाने एक किंवा जास्त उच्च अधिकारी असलेल्या समितीची स्थापना केली आहे.

**राज्य समितीची कार्ये :**

१. जनुकिय इस्पितळे, केंद्र वा प्रयोगशाळांची अधिकृत नोंदणी करणे वा ती नोंदणी रद्द करणे
२. या सर्व केंद्रांवर कायद्याच्या नियमांच्या अंमलबजावणीसाठी उपाय करणे.
३. कायद्याचे उल्लंघन केलेल्या केंद्रावर कार्यवाही करणे, त्यासंबंधी तक्रारी नोंदवून घेणे, त्याचे निवारण करणे.
४. माहिती मिळाली तर स्वत:हून गुन्हे करणाऱ्या केंद्रावर/व्यक्तींवर कार्यवाही करणे.
५. कायद्याबद्दल लोकजागृती करणे.

## उद्देश :

कुटुंबातील कोणत्याही पुरुष नातेवाईकांकडून जर स्त्रिचा शारिरीक व मानसिक, आर्थिक सामाजिक वा इतर प्रकारचा छळ होत असेल तर हया कायदयाअंतर्गत स्त्रिला दादच नाही तर संरक्षण मागता येते. स्त्रियांवर होणाऱ्या कौटुंबिक अत्याचाराबाबत भारतीय दंड संहितेनुसार फौजदारी कायदा अस्तित्वात आहे. परंतु, कौटुंबिक अत्याचाराबाबत प्रतिबंधक आदेशाच्या स्वरुपात प्रभावी उपाययोजना असणारा दिवाणी कायदा अमलात आणण्याच्या उद्देशाने प्रस्तुतचा कायदा दि. २९–०८–२००५ पासून अस्तित्वात आला.

## कौटुंबिक छळ म्हणजे काय?

तुमच्याशी किंवा तुमच्यावर अवलंबून व तुमच्या ताब्यात असलेल्या मुलांशी तुमच्याबरोबर राहणारी व्यक्ती पुढील कोणत्याही प्रकारे छळ करीत असेल तर तुम्हाला या कायदयाअंतर्गत संरक्षण वा मदत मिळण्याचा अधिकार आहे.

(१) महिलेचा शारिरीक अथवा लैंगिक छळ

(२) धमकी देणे अथवा शिवीगाळ देणे

(३) मारहाण करणे

(४) आर्थिक छळ, आर्थिक सहाय्य नाकारणे, तिच्याकडून तिच्या कमाईचे पैसे काढून घेणे, पैसे कमाविण्यास परवानगी न देणे

(५) भावनिक छळ

(६) हुंडा आणण्यासाठी सतत त्रास देणे

(७) अपमान करणे

(८) तिला दररोज लागणाऱ्या गरजांपासून वंचित करीत असेल

## महत्वाची अट

जी स्त्री पुरुषाविरुद्ध दाद वा संरक्षण मागते, ते दोघेजण एकाच घरात/कुटुंबात रहात असले पाहिजे वा कधी एकेकाळी रहात असतील तर दाद मागता येईल.

प्रस्तुत कायदयांतर्गत संरक्षण मिळण्यासाठी घरगुती हिंसाचाराची घटना घडल्यास अशा पिडीत स्त्रीने स्वत: व संरक्षण अधिकाऱ्यांमार्फत त्या क्षेत्रातील न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयाकडे अर्ज दाखल करावा. सदर अर्जाचे कामी पक्षकारांमध्ये समन्वयाचे प्रयत्न देखील करता येतील. अशा अर्जाचे कामी घरगुती हिंसाचार घडण्याचे सकृतदर्शनी दिसत असल्यास एकतर्फी अंतरीम आदेश करता येतो. अशा अर्जाचा निर्णय दोन महिन्यात देणे अपेक्षित आहे. अशा निर्णयाविरुद्ध तीस दिवसांचे आत सेशन्स कोर्टाकडे अपील करता येते.

**कोणकोणत्या पुरुष नातेवाईकांविरुध्द दाद मागता येते ?**

१) स्त्रीचा नवरा लग्न न करता एकत्र नवरा बायकोसारखे रहात असतील तर तो पुरुष, सासरा, दीर

२) इतर रक्ताची नाते असलेली म्हणजे नवऱ्याचे काका, मामा सुध्दा

**दंडात्मक कारवाई –**

प्रतिवादीने न्यायालयीन आदेशाचे पालन न केल्यास एक वर्षापर्यंत कैद व रु.२०,०००/– पर्यंत दंड ही सजा होईल.

संरक्षण अधिकाऱ्याने कर्तव्य पार पाडली नाही तर त्यांनाही एक वर्ष कैद व रु.२०,०००/– पर्यंत दंड ही शिक्षा होईल. या कायदयातील नमूद सर्व गुन्हे अजामीनपात्र व दखलपात्र आहेत.

**या कायदयाअंतर्गत चालणारी प्रक्रिया :–**

कौटुंबिक हिंसाचाराची घटना झाल्याची नोंद स्वत: ती व्यक्ती अथवा तिच्या बदल्यात अन्य कोणीही तक्रार करु शकतात.

**तक्रार कशी कराल –**

- प्रत्यक्ष जाऊन संरक्षण अधिकारी अथवा पोलीस यांच्याकडे तक्रार नोंदवता येते.
- अर्जावर फिर्यादीची सही असणे आवश्यक असते.
- साध्या कागदावर दहा रुपयाचा स्टॅम्प लावून तक्रार नोंदवता येते.
- पोलीसांकडे गेलात तर पोलीसांनी तुमचा अर्ज कौटुंबिक हिंसाचार घटना अहवाल म्हणून नोंद करुन संरक्षण अधिकारी व न्यायाधिशांकडे पाठवावा.
- सेवा देणाऱ्या स्वयंसेवी संस्थांकडे अर्ज दिला असता तुमचा अर्ज कौटुंबिक हिंसाचार घटना अहवाल म्हणून नोंद करुन संरक्षण अधिकारी व न्यायाधिशांकडे पाठवावा.

**तिला हया कायद्यामुळे खालील हक्क मिळू शकते.**

- संरक्षण आदेश
- आर्थिक स्वरुपात नुकसान भरपाई
- घरात राहू देण्याबद्दलची परवानगी व इतर सवलती ती न्यायालयात अर्ज करुन मागवू शकते.
- ती ज्या कुटूंबात रहात होती तिथेच राहू देण्यात यावे अशी मागणी ती करु शकते.

**"हुंडा" म्हणजे काय ?**

लग्नामधील एका पक्षाने स्वत: वा त्याच्या पालकाने वा अन्य कोणीही दुसऱ्या पक्षास लग्नाचेवेळी, लग्नाचे पूर्वी किंवा लग्नानंतर केव्हाही सदर लग्नासंदर्भात कोणतीही रक्कम वा मौल्यवान वस्तू प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे दिली असेल किंवा देण्याचे कबुल केले असेल तर अशी रक्कम वा वस्तू म्हणजे "हुंडा" होय.

मुस्लिम लग्नामध्ये दिली जाणारी मेहेरची रक्कम "हुंडा" नसतो.

**अपराध व शिक्षा :—**

१ हुंडा देणारा व घेणारा तसेच त्यांना मदत करणारा असे सर्वजण प्रस्तुत कायदयान्वये गुन्हेगार असून त्यांना कमीत कमी पाच वर्षे कैद व रुपये पंधरा हजार किंवा हुंडयाची रक्कम यापैकी जी जास्त असेल त्या रक्कमेचा दंड अशी शिक्षा होऊ शकते.

२ वधू वा वर यांचे आई—वडील वा पालक यांचेकडून प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे हुंडा मागणाऱ्यास किमान सहा महिने ते दोन वर्षे व रुपये दहा हजार पर्यंत दंड अशी शिक्षा देता येते.

३ एखाद्या व्यक्तीने त्याची मुलगी, मुलगा किंवा इतर नातेवाईक यापैकी कोणाच्याही लग्नाच्या मोबदल्यात कोणतीही रक्कम वा मालमत्ता/व्यवसायातील हिस्सा देण्याचा प्रस्ताव वर्तमानपत्र वा नियतकालिकाद्वारे प्रसिध्द केल्यास त्याला किमान सहा महिने ते ५ वर्षे किंवा रुपये पंधरा हजार पर्यंत दंड अशी शिक्षा देता येते.

**"हुंडया" चा विनियोग :—**

असा हुंडा प्रत्यक्ष ज्या वधूसाठी दिला तिच्या ताब्यात मिळाला नसेल तर, ज्या व्यक्तीस हुंडा प्रत्यक्ष ताब्यात मिळाला त्याने तो लग्नापूर्वी मिळाला असल्यास लग्नानंतर तीन महिन्यांचे आत सदर स्त्रीस हस्तांतरीत करावा. हुंडा लग्नात वा लग्नानंतर मिळाला असल्यास तो मिळाल्यापासून तीन महिन्यांचे आत अशा स्त्रीस परत करावा अन्यथा, अशा व्यक्तीस किमान सहा महिने ते दोन वर्षे किंवा किमान पाच हजार ते दहा हजार दरम्यानचा दंड किंवा दोन्ही शिक्षा होऊ शकतात.

हुंडा अशा स्त्रीचे ताब्यात मिळणेपूर्वी व लग्नानंतर सात वर्षाचे आत तिला अनैसर्गिक मृत्यू आल्यास अशी हुंडयाची रक्कम, वस्तू वा मिळकत ही तिला अपत्य असल्यास अपत्यास व अपत्य नसल्यास तिच्या आईवडीलांना मिळू शकते.

हुंडयासंबंधीची तक्रार स्वत: पिडीत स्त्री अथवा तिचे पालक, नातेवाईक यांना तसेच मान्यताप्राप्त संस्थेमार्फत देखील दाखल करता येते.

सदर कायदयाखालील सर्व गुन्हे अजामीनपात्र असून तडजोडपात्र नाहीत. तसेच गुन्हयांबाबत चालणाऱ्या खटल्यांमध्ये हुंडा घेतला नाही वा घेण्यास मदत केली नाही किंवा मागणी केली नाही या बाबी सिध्द करण्याची जबाबदारी आरोपीवर असते.

## हुंडाबळी म्हणजे काय ?

भारतीय दंड संहितेतील कलम ३०४–ब मध्ये "हुंडा–बळी" ची व्याख्या करुन हुंडा–बळीचा गुन्हा करणाऱ्यास कमीत कमी सात वर्षे ते जन्मठेप अशा शिक्षेची तरतूद केली आहे.

एखाद्या स्त्रीचा लग्नानंतर सात वर्षांचे आत भाजून किंवा शारिरिक जखमांमुळे किंवा अनैसर्गिक परिस्थितीत मृत्यू झाला असेल व तिच्या मृत्यूपूर्वी तिचे पती किंवा त्याचे नातेवाईक यांनी हुंडयाच्या कारणावरुन तिचा छळ केल्याचे निदर्शनास आल्यास असा मृत्यू "हुंडा–बळी" होतो व तिचे पती किंवा नातेवाईक यांनी तिचा मृत्यू घडवल्याचे गृहीत धरण्यात येते.

## भारतीय पुरावा कायदा कलम ११३–ब :–

कोर्टापुढे जेव्हा असा प्रश्न असतो की आरोपीने हुंडाबळीचा अपराध केला आहे का? आणि असे दाखविण्यात आले आहे की तिच्या मृत्यूचे लवकर आधीच त्या स्त्रीला क्रूरपणे वागविले होते अगर तिला जाच–त्रास दिला जात होता आणि त्यामागे हुंडयाची मागणी होती तर कोर्ट असे गृहित धरील (Shall Presume) की त्या व्यक्तीने हुंडाबळीचा अपराध केला आहे.

## हुंडयासाठी छळवणूक :–

अशा अज्ञान मुलांबाबत वा त्याच्या मिळकतीबाबत त्याचे नैसर्गिक पालक म्हणजेच वडील मृत्यूपत्रान्वये पालकाची नेमणूक करु शकतात. आईपूर्वी असे वडील मयत झाल्यास अशी नेमणूक अंमलात येत नाही. परंतु आईच्या पश्चात तिने इतर कोणाची पालक म्हणून मृत्यूपत्राने नेमणूक केली नसल्यास अगोदरची वडीलांनी केलेली पालकत्वाची नेमणूक लागू होते. कोणत्याही कारणास्तव हिंदू स्त्री अज्ञान औरस संततीची पालक असल्यास ती मृत्यूपत्राने पालक म्हणून एखादया व्यक्तीची नेमणूक करु शकते. तसेच हिंदू स्त्री अनौरस अज्ञान मुलाची पालक असल्यास त्याच्या बाबत अथवा त्याच्या मिळकतीबाबत मृत्यूपत्राद्वारे पालकाची नेमणूक करु शकते. अशा प्रकारे नेमलेल्या पालाकाची नेमणूक अज्ञान व्यक्ती मुलगी असल्यास तिच्या लग्नानंतर संपुष्टात येते.

## भारतीय दंड संहिता कलम ४९८–अ प्रमाणे दंडनीय अपराध.

एखाद्या स्त्रीच्या पतीने वा त्याच्या नातेवाईकांनी तिचा छळ केल्यास वा तिला निर्दयतेची वागणूक दिल्यास त्यांना तीन वर्षापर्यंत कैद व दंडाची शिक्षा होऊ शकते. सदरची "निर्दयी" अथवा "क्रूर" वागणूक म्हणजेच 'छळ' या संज्ञेबाबत सदर तरतुदीन्वये खालीलप्रमाणे खुलासा दिला आहे :–

अशा स्त्रीने स्वत:च्या जिवीतास वा आरोग्यास अपाय करुन घ्यावा अथवा आत्महत्येचा विचार करावा या स्वरुपाची वागणूक जाणीवपूर्वक करणे, अथवा

अशा स्त्रीकडून वा तिच्या नातेवाईकांकडून मिळकतीची वा मौल्यवान वस्तूची बेकायदेशीर मागणी करणे किंवा अशी मागणी पूर्ण केली नाही म्हणून अशा स्त्रीचा शारिरिक वा मानसिक छळ करणे.

भारतीय कुटुंब पध्दती ही संपूर्ण जगात आदर्श कुटुब पध्दत आहे. परंतु आधुनिक भारतात ही एकत्र कुटुंब पध्दत हळूहळू लोप पावू लागली आहे. बरेच जण त्रिकोणी व चौकोनी कुटूंबाला प्राधान्य देऊ लागले आहेत. साहजिकच वृध्द मातापित्यांची रवानगी वृध्दाश्रमात होऊ लागली आहे. लोकांचा पैशाचा हव्यास वाढू लागला आहे. जो तो पैशाच्या मागे धावू लागला आहे. केवळ स्वत:पुरताच विचार करण्याची वृत्ती बळावल्यामुळे आपल्याच जवळच्या लोकांकडे त्यांचे दुर्लक्ष होऊ लागले आहे. प्रत्येक मुलाला व मुलीला आपले पालनपोषण व सांभाळण्याची नैतिक जबाबदारी आई वडीलांची आहे असे वाटते. परंतु ज्यावेळी ती मुले वा मुली सज्ञान होऊन स्वत:च्या पायावर उभे राहतात व कमवू लागतात, त्यावेळी आपल्या वृध्द झालेल्या आई वडीलांच्या पालनपोषणाची जबाबदारी आपल्यावर आहे हे ते विसरुन जातात. अशा मुलांना व मुलींना त्यांच्यावर अवलंबून असलेल्या आई वडील, पत्नी व मुलांची पालनपोषणाची कायदेशीर व नैतिक जबाबदारीची जाणीव करुन देणेकरीता सरकारने फौजदारी प्रक्रिया संहितेमध्ये काही तरतूदी केलेल्या आहेत. जो पुरुष आपल्या बायका मुलांचे पालनपोषण करण्याचे प्राथमिक कर्तव्य करण्यात कसूर करतो, त्यांचेविरुध्द फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ मधील प्रकरण ९ मधील कलम १२५ ते १२८ मध्ये कायदेशीर तरतुदींचा समावेश केला आहे.

**<u>कलम १२५</u> :—**

सदर फौजदारी तरतुदीनुसार, जो कोणी पुरुष त्याची ऐपत असूनही आपला उदरनिर्वाह करण्यास असमर्थ असलेल्या बायकोस किंवा आई वडीलांस व आपल्या औरस किंवा अनौरस अज्ञान मुलास, विवाहित असेल किंवा नसेल किंवा स्वत:च्या निर्वाहाची तजवीज करण्यास असमर्थ असेल किंवा आपल्या औरस किंवा अनौरस अपत्यास, विवाहीत मुलगी सोडून, जे मूल सज्ञान असूनही शारिरीक किंवा मानसिक विकृतीमुळे किंवा दुखापतीमुळे स्वत:च्या निर्वाहाची तजवीज करण्यास असमर्थ असेल त्यांना निर्वाह करण्यासंदर्भात निष्काळजीपणा दाखवित असेल व तसा पुरावा प्रथम वर्ग न्यायदंडाधिका—यासमोर आल्यास त्या इसमाला त्याच्या पत्नीला, आईवडीलांना व मुलांना निर्वाहाकरीता योग्य तो पोटगी देण्याचा आदेश करता येईल. सदरची तरतूद अज्ञान मुलींना ती सज्ञान होईपर्यंत लागू आहे. तसेच विवाहीत अज्ञान मुलीच्या नव-याला तिला सांभाळण्याची ऐपत नसेल तर तिला देखील वडीलांकडे पोटगी मागणेचा अधिकार आहे.

वरील तरतुदींखाली 'पत्नी' या शब्दामध्ये जरी स्त्रीला तिच्या नव-याने घटस्फोट दिला असेल अथवा तिने घेतला असेल व पुनर्विवाह केला नसेल तर ती स्त्री देखील येते.

एखाद्या व्यक्तिविरुध्द पोटगी देण्याचा आदेश झाला व त्याने तो आदेश पाळला नाही तर त्याचे कडून येणे असलेली रक्कम वसूल करण्यासाठी अधिपत्र काढता येते. सदर अधिपत्राची अंमलबजावणी झाल्यास देय असलेल्या प्रत्येक महिन्याच्या पोटगीच्या सर्व रक्कमेबद्दल किंवा त्या रक्कमेच्या कोणत्याही भागाबाबत एक महिन्याच्या मुदतीपर्यंत अथवा त्या संपूर्ण रक्कमेचा भरणा होईपर्यंत त्या व्यक्तिला कैदेची शिक्षा ठोठावता येते.

वरील तरतूदी जर पत्नी व्यभिचारी असेल अथवा कोणत्याही सबळ कारणाशिवाय नव-याजवळ

राहण्यास नकार देत असेल अथवा नवरा व बायको हे दोघेही एकमेकांचे संमतीने विभक्त रहात असतील तर त्या स्त्रीला पोटगी मागता येत नाही.

फौजदारी प्रक्रिया संहितेत कलम १२५ चा समावेश हा सामाजिक व विधायक दृष्टीकोन लक्षात ठेवून करण्यात आलेला आहे. सदर कलम समाविष्ट करण्यामागे पत्नीला, मुलांना व आई वडीलांना उपासमारीपासून वाचविणे ही एक महत्वाची भूमिका विचारात घेतली आहे. त्यामुळे या कलमाची सुरुवात 'पोटगी' या शब्दापासून झाली आहे. पोटगीमध्ये केवळ अन्न, वस्त्र, निवारा याचाच समावेश होत नाही, तर जगण्याकरीता ज्या आवश्यक गोष्टी आहेत त्यांचाही समावेश होतो. सदर कलमामागील भूमिका ही उपाशी राहणाऱ्या पत्नीस, मुलांस व आई वडीलांना ताबडतोब न्याय मिळवून त्यांचा उदरनिर्वाह होईल व त्यांना यातना होणार नाहीत हीच आहे. त्यामुळे कलम १२५ खाली चौकशी ही संक्षिप्त चौकशी ठेवली आहे. दिवाणी चौकशी प्रमाणे नवऱ्याची, वडीलांची किंवा मुलांची जबाबदारी होती किंवा आहे का?याबाबतचा वाद कलम १२५ खालील चौकशीत उपस्थित करता येत नाही.

कलम १२५ खालील अर्जाची चौकशी करतांना दोन महत्वाचे मुद्दे विचारात घेणे अत्यंत आवश्यक आहेत. त्यापैकी एक मुद्दा ज्या व्यक्तिविरुध्द अर्ज केला आहे ती व्यक्ती पत्नी, मुले, आई वडील यांचा जाणूनबुजून सांभाळ करीत नाही व दुसरा मुद्दा पत्नी, मुले, आईवडील हे स्वत:चा सांभाळ, देखभाल करण्यास असमर्थ आहेत. सदर कलमाखाली केलेला अर्ज हा फौजदारी तक्रारी अर्ज नसतो. त्यामुळे विरुध्द पक्ष हा आरोपी नसतो. ज्यावेळी पोटगीचे प्रकरण दाखल होते त्यावेळी प्रतिपक्षावर नोटीस बजावणे अत्यंत आवश्यक आहे. अशा प्रकारची प्रकरणे विवाहाच्या वैधतेस दिवाणी न्यायालयात आव्हान दिले आहे या कारणावरुन स्थगित करता येत नाहीत. विवाहाच्या वैधतेबाबत दंडाधिकाऱ्यांनी चौकशी करु नये कारण ती बाब दिवाणी न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात येते. पोटगी प्रकरणात विवाहाच्या वैधतेबाबत चौकशी करता येत नाही कारण ती बाब दिवाणी न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात येते. त्यामुळे पती पत्नींचा विवाह झाल्याचे सिध्द झाले नाही तरी त्यांचे सहवासातून जन्मलेल्या मुलांस वडीलांकडून पोटगी मागता येते. ज्या व्यक्तिविरुध्द प्रकरण दाखल झाले आहे त्या व्यक्तिची काम करण्याची क्षमता व पगार मिळविण्याची पात्रता विचारात घेऊन जर ती व्यक्ती सक्षम ठरली व ती अर्जदाराचा सांभाळ करण्यास टाळाटाळ करते हे सिध्द झाले तर पोटगी प्रकरणात आदेश करण्याचा अधिकार प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांना आहे.

फौजदारी प्रक्रिया संहितेमध्ये प्रकरण ९ हे स्त्रिया, मुले व आई वडील यांच्या उदरनिर्वाहाबाबत केलेली विशेष तरतूद आहे. पत्नी, मुले आई वडील यांच्या चरितार्थाकरीता काही साधने असावीत व नवरा, मुलगा, मुलगी, वडील इत्यादींची त्यांचे पालनपोषण करण्याची जबाबदारी असावी यामुळे ही विशेष तरतूद केली आहे. त्याचाच एक भाग म्हणून न्यायालयाचे आदेशाचे पालन न करणाऱ्या व्यक्तिस शिक्षा म्हणून कैद करुन ठेवण्याची तरतूद आहे. मात्र अशा व्यक्तिस तुरुंगात कैद करुन ठेवल्याने पत्नी, मुले आई वडील यांच्या चरितार्थाचा प्रश्न सुटत नाही. सदर व्यक्तिस कैद करुन ठेवल्याने त्याची पोटगी देण्याची जबाबदारी संपुष्टात येत नाही.

पोटगी करीता कलम १२५ प्रमाणेच हिंदू विवाह कायदा कलम २४ प्रमाणे अर्ज करता येतो. या दोन्ही कलमांचा उद्देश थोडाफार वेगळा आहे. मात्र कलम १२५ खाली पोटगी नाकारली तरी त्याचा परिणाम कलम २४ खालील पोटगीचे अर्जावर होत नाही.

कलम १२५ खाली झालेल्या पोटगीच्या आदेशाची प्रत ज्याच्या बाजूने आदेश झाला असेल त्याला व जर आदेश लहान मुलांचे बाजूने झाला असेल तर त्यांचे पालकांना किंवा ज्या व्यक्तिच्या बाजूने आदेश झाला असेल त्याला कोणतेही शुल्क न आकारता दिली जाते. ज्याचे विरुध्द आदेश झाला असेल ती व्यक्ती जेथे रहात असे तेथील दंडाधिकारी त्या आदेशाची अंमलबजावणी करु शकतात. परंतु त्या व्यक्तिच्या ओळखीबद्दल व पोटगीची देय रक्कम दिली गेलेली नाही याबद्दल दंडाधिकाऱ्यांची खात्री पटणे आवश्यक आहे.

प्रस्तुत कलमाखाली पोटगीच्या मूळ अर्जाची सुनावणी होईपर्यंत दरम्यानचे काळातील पोटगी मिळू शकते. सदर दरम्यानची पोटगी देण्याचा आदेश हा 'अंतरिम आदेश' नसल्याने त्याचे विरुध्द रिव्हीजन दाखल करता येत नाही.

मा. सर्वोच्च न्यायालयाने डॉ. विजया मनोहर आरलट वि. काशीराम राजाराम सावई, ए.आय. आर. १९८७ सुप्रीम कोर्ट, ११०० मध्ये असे धरले आहे की, कलम १२५ खाली आई वडील आपल्या विवाहीत मुलीकडेही पोटगी मागू शकतील, मात्र त्या मुलीला पुरेसे उत्पन्नाचे साधन आहे व तिचे आई वडील स्वत:चा सांभाळ करणेस असमर्थ आहेत अशी न्यायालयाची खात्री झाली पाहिजे.

मा. उच्च न्यायालयाने बाली नारायण वि. श्रीमती सिध्देश्वरी, १९८१ क्रि.एल.जे. ६७४ मध्ये असे धरले आहे की, एखादी स्त्री व पुरुष हे पती–पत्नी म्हणून एकत्र रहात असतील व तो पुरुष त्या स्त्रीला पत्नी मानत असेल तर जरी लग्नाचे धार्मिक विधी झाले नसले तरी ती स्त्री 'पत्नी' या संज्ञेत येते.

मा. उच्च न्यायालयाने रमण पिल्लई वासुदेव नायर वि. सुभद्रा अम्मा निर्मलादेवी, १९८९ (१) डीएमसी २०१ (केरळा) मध्ये असे धरले आहे की, एखादया पुरुषाचे प्रथम लग्न झाले असेल तर जरी त्याचे दुसऱ्या स्त्री बरोबर हिंदू धर्म शास्त्राप्रमाणे लग्न झाले तरी ते कायदेशीर ठरत नाही. त्या स्त्रिला कायदेशीर पत्नीचा दर्जा प्राप्त होत नाही.

मा. उच्च न्यायालयाने सुधा पाटील वि. राजकुमार पाटील, १९९७ (२) एमएलजे २५० मध्ये असे धरले आहे की, पती हा शारिरीक दृष्टया अपंग असला किंवा त्यास उत्पन्नाचे साधन नसले किंवा तो आंधळा असला तरी पत्नी वा मुलांचा सांभाळ करण्याची त्याची जबाबदारी आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाने मोहम्मद अहमद खान वि. शहा बानो बेगम, १९८५ (२) एस.सी.सी. ५५६ मध्ये असे धरले आहे की, मुस्लिम वैयक्तिक कायदयाखाली मेहेरची रक्कम घटस्फोट घेताना पोटगी म्हणून घेतली जाते. मात्र मेहेरची रक्कम दिली म्हणून कलम १२५ खाली पोटगीचा आदेश रद्द होत नाही.

# बालकांसंबंधीचे कायदे

## बाल विवाह प्रतिबंधक कायदा, १९२९

प्रस्तुत कायदयान्वये 'बाल' या संज्ञेत २१ वर्षाखालील पुरुष व १८ वर्षाखालील स्त्री यांचा समावेश आहे.

१८ वर्षे पूर्ण झालेल्या म्हणजे सज्ञान अशा पुरुषाने वयाची २१ वर्षे पूर्ण होण्यापूर्वी बालविवाह केल्यास त्यास १५ दिवसांपर्यंत साधी कैद किंवा रु.१०००/– पर्यंत दंड वा दोन्ही अशी शिक्षा होऊ शकते.

२१ वर्षे पूर्ण झालेल्या पुरुषाने बालविवाह केल्यास म्हणजे १८ वर्षे पेक्षा कमी असणाऱ्या मुलीशी विवाह केल्यास त्यास ३ महिनेपर्यंत साधी कैद व दंड अशी शिक्षा होऊ शकते.

असा बालविवाह जाणीवपूर्वक करुन देणाऱ्या व्यक्तीस देखील वरीलप्रमाणेच शिक्षा होऊ शकते. बालविवाह झाल्यास अशा बालकांच्या पालकांस, त्यांनी तो विवाह जाणीवपूर्वक होऊ दिला असे गृहित धरुन त्यांना वरीलप्रमाणेच शिक्षा होऊ शकते. परंतु, कोणतीही स्त्री अशा शिक्षेस पात्र ठरत नाही.

अशा विवाहापासून एक वर्षानंतर न्यायालयास सदर गुन्हयाची दखल घेता येणार नाही.

बालविवाहाचे आयोजन केल्याचे सकृतदर्शनी दिसत असल्यास असा विवाह होऊ नये असा प्रतिबंधक मनाई हुकूम न्यायालयास देता येतो. परंतु, त्यापूर्वी अशा व्यक्तीस कारणे दाखवा नोटीस देणे आवश्यक आहे. अशा मनाई हुकूमाचे उल्लंघन करण्यास तीन महिनेपर्यंत कैद किंवा रुपये १ हजारपर्यंत वा दोन्ही अशी शिक्षा होऊ शकते.

- कोणत्याही व्यवसायात, उद्योग धंद्यात, कारखान्यात किंवा कार्यालयांत १४ वर्षांखालील वयाच्या मुला–मुलींना कामावर ठेवण्यास पूर्णपणे बंदी आहे. मात्र कुटुंबातील कामासाठी म्हणून घरचीच मुले काम करीत असल्यास ते बेकायदेशीर ठरत नाही.

**१४ ते १८ वर्षापर्यंतच्या मुलामुलींना कामावर ठेवतांना खालील नियमांचे पालन करावे लागते :**

- एका दिवसांत सहा तासापेक्षा जास्त वेळ काम देता येणार नाही. या सहा तासांपैकी एका तास सुट्टी पण द्यावी लागेल.
- कोणत्याही बालमजुरास सायंकाळी ७.३० ते सकाळी ८.०० च्या दरम्यान कामावर ठेवता येत नाही.
- एका दिवसांतील किमान कामाच्या वेळेपेक्षा जास्त काम दिल्यास दुसऱ्या दिवशी सुट्टी द्यावी लागते.
- आठवड्यात एक दिवस सुट्टी देणे सक्तीचे आहे.
- ज्या व्यक्तीच्या अधिकारांतर्गत बालमजूर कामावर असतील त्याने स्वत:ची पूर्ण माहिती व कामाचे स्वरुप, व्यवसायाची कार्यपध्दती याबाबत, संबंधित कार्यक्षेत्रातील या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याकडे लेखी स्वरुपात माहिती द्यावी.
- बालकाच्या वयाबद्दल बालमजूर अधिकाऱ्यास संशय असेल तर शासनमान्य वैद्यकीय अधिकाऱ्याच्या सहाय्याने वय तपासून घ्यावे.
- तसेच प्रत्येक व्यावसायिक, कारखानदार वा उद्योगधंद्यात मालकावर, त्याच्याकडे काम करीत असलेल्या त्या सर्व बालमजूरांची पूर्ण माहिती व इतर खालील माहिती असलेले रजिस्टर ठेवणे सक्तीचे असते.

  कामाचे तास व देण्यात येणारी सुट्टी
  कामाचे स्वरुप
  कामाचा मोबदला

- बालकांच्या आरोग्याच्या दृष्टीने खालील गोष्टींच्या सेवासुविधा कामाच्या ठिकाणी असाव्यात–

  कामाचा परिसर स्वच्छ व प्रदूषणमुक्त असावा.
  योग्य तापमान, हवेशीर वातावरण
  योग्य प्रकाश
  स्वच्छ पिण्याचे पाणी
  स्वच्छतागृह

**<u>शिक्षा</u>**

- १८ वर्षाखालील मुला–मुलींना कामावर ठेवल्यास प्रथम वेळेस ३ महिने ते १ वर्षापर्यंत कैद व २० हजार रुपयांपर्यंत दंड व पुन्हा तोच गुन्हा केल्यास ६ महिने ते २ वर्षापर्यंत कैद आणि ३० हजारपर्यंत दंड होऊ शकतो.
- इतर कोणत्याही नियमांचे उल्लंघन केल्यास संबंधितांस किमान १ महिना कैद व १० हजार रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो.

## (ज्युवेनाइल जस्टीस ॲक्ट : २०००)

**कायदा कोणासाठी?**

- १८ वर्षाखालील वयाच्या बालगुन्हेगारांसाठी (मुले किंवा मुली)
- तसेच खालील परिस्थितीतील १८ वर्षापर्यंतच्या बालकांसाठी.
  - राहण्यास घर नसलेले किंवा अनाथ
  - पालक सांभाळण्यास असमर्थ असल्यास
  - ज्या व्यक्तीकडे राहत असतात, त्यानेच संबंधित बालकाला जिवे मारण्याची धमकी दिल्यामुळे मानसिक दडपणाखाली असलेले बालक
  - देहव्यापारासाठी सक्ती केलेले
  - शारीरिक किंवा मानसिक अपंगत्व असलेली अनाथ बालके
  - बेकायदेशीररित्या शोषित बालके
  - नैसर्गिक आपत्ती, युध्द, दंगे इत्यादी आणीबाणीच्या वेळी अनाथ झालेली मुले. या मुलांची काळजी व संरक्षण घेण्यासाठीच्या तरतुदी या कायद्यात आहेत.

**महत्वाचे :**

- कायद्याच्या अंमलबजावणीसाठी प्रत्येक राज्यात जिल्हा पातळीवर एक वा अनेक बालन्याय मंडळे, बालकल्याण समित्या आणि बालगुन्हेगारांसाठी विशेष विशेष पोलीस दल स्थापित केले आहेत.
- या कायद्यांतर्गत बालगुन्हेगारांसाठी राज्यात ठिकठिकाणी (विधीसंघर्षग्रस्त मुलांसाठी) निरीक्षणगृहे, विशेषगृहे उभारण्यात आली आहेत.
- १८ वर्षाखालील बालकाने अपराध केल्यावर पोलिसांनी त्याचा ताबा ताबडतोब स्थापित विशेष पोलीस दलाकडे द्यायला पाहिजे.
- विशेष पोलीस दलाने बालगुन्हेगाराला ताब्यात घेतल्याबरोबर, त्यांना संबंधित बालकाची माहिती बालन्याय मंडळ व त्याचे आई–वडील वा पालकांना कळवावी लागते.
- संबंधित पोलीस पथकाला ताब्यातील बालगुन्हेगाराची काळजी पालकाप्रमाणे घ्यावी लागते.
- कोणत्याही अपराधासाठी १८ वर्षाखालील वयाच्या बालकास विशेष पोलीस दलाला, बालमान्य मंडळासमोर उपस्थित करणे बंधनकारक आहे. तसेच अशा बालगुन्हेगारांना सुरक्षा ठेव न घेताही

जामिनावर सोडण्याचे अधिकार बालन्याय समितीला आहेत, किंवा जामीनावर मुक्त केल्यास बालगुन्हेगारांच्या जिवाला धोका असल्यास, अपराधी वृत्तीच्या लोकांकडून गैरवापर होऊ शकतो, असे वाटल्यास त्याची रवानगी खटल्याचा निकाल लागेपर्यंत निरीक्षणगृहात करण्याचे आदेश मंडळ देऊ शकते.

- कोणत्याही परिस्थितीत जास्तीत जास्त तीन वर्षापर्यंतच बालगुन्हेगारास विशेषगृहात ठेवता येते.
- विशेष म्हणजे बालगुन्हेगारास मृत्यूदंड किंवा आजन्म कारावासाची शिक्षा देता येत नाही.
- सज्ञान व्यक्तीसोबत एखाद्या बालकावर गुन्ह्याचा आरोप असल्यास, सज्ञान व्यक्तीविरुध्द खटला साधारण न्यायालयात चालेल, मात्र बालकाविरुध्दचा खटला बालन्यास समितीसमोरच चालेल.
- अनाथ व संरक्षणाची गरज असलेल्या बालकासंबंधी निर्णय घेणे, त्यांना संरक्षण देण्याची जबाबदारी नेमलेल्या बालकल्याण समितीची असते. अशा मुलांना बालगृहात दाखल केले जाते.
- स्वत: अनाथ बालक, बालकांसाठी काम करणाऱ्या सामाजिक संस्था, पोलीस, पालक किंवा जबाबदार नागरिक सुध्दा, अशा काळजी व संरक्षणास पात्र बालकांना बाकल्याण समितीकडे हजर करु शकतात.
- विशेषगृहात वा बालगृहात असलेल्या बालकांची तेथून सुटका झाल्यावर पुनर्वसनाची जबाबदारी सुध्दा अनुक्रमे बालन्यायमंडळ व बालकल्याण समितीवर आहे.
- अन्यथा कायदेशीर पध्दतीने दत्तक देऊन, राज्यशासनाच्या वेगवेगळ्या योजनांखाली त्या बालकांचे शिक्षण व पालन करणे किंवा त्यांना शासनमान्य पुनर्वसन केंद्रात पाठविणे असे मार्ग उपलब्ध आहेत.

**<u>शिक्षा :</u>**

- आरोपी बालकाचा ताबा असलेल्या पोलीस दलाद्वारे किंवा अधिकाऱ्याद्वारे संबंधित बालकास शारीरिक वा मानसिक इजा पोहोचल्यास, निष्काळजीपणाची वागणूक दिल्यास, जबाबदार दलातील अधिकाऱ्यास सहा महिन्यांपर्यंत कैद व दंड होऊ शकतो.
- १८ वर्षाखालील बालकास भीक मागण्यासाठी, मद्य पिण्यास वा नशा करण्यास भाग पाडणाऱ्या व्यक्तीस तीन वर्षांपर्यंत कैद व दंड शिक्षा होऊ शकतो.
- १८ वर्षाखालील बालकास धोकादायक कामावर, मजूर म्हणून ठेवल्यास व त्याची मिळकत रोखल्यास, संबंधिताला तीन वर्षांपर्यंत कैद व दंड होऊ शकतो.

बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण अधिकार, २००९ हा ६ वर्षे ते १४ वर्षापर्यंतच्या मुलांना सक्तीचे शिक्षण देण्याबाबतचा कायदा आहे. सदर कायदा भारतातील सर्व राज्यांना जम्मु व काश्मीर सोडून केंद्र सरकारद्वारा लागू करण्यात आला आहे. बालकांच्या व्याख्येत १४ वर्षाखालील सर्व मुलामुलींचा समावेश होतो. सदर कायदयानुसार प्राथमिक शिक्षण हे पहिल्या इयत्तेपासून आठव्या इयत्तेपर्यंतच्या शिक्षणाच्या संबंधित आहे.

**हया कायदयाची ठळक वैशिष्टये खालीलप्रमाणे आहेत :-**

१) प्रत्येक बालक ज्याचे वय ६ वर्षे ते १४ वर्षापर्यंत आहे, त्याला मोफत व सक्तीचे शिक्षण घेण्याचा अधिकार आहे. तसेच त्याला ते राहात असलेल्या नजीकच्या शाळेत प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत सक्तीचे शिक्षण घेण्याचा अधिकार आहे. हयाकरीता त्याला कुठल्याही प्रकारची फी दयावी लागणार नाही. (कलम ३)

२) कायदयाच्या कलम ४ अन्वये ज्या मुलांचे प्राथमिक शिक्षण पूर्ण झालेले नाही व त्यांनी शाळेत प्रवेश घेतला नसेल त्यांच्याकरीता विशेष तरतूद करण्यात आलेली आहे. हया कलमानुसार जे बालक ६ वर्षापेक्षा मोठे आहे, परंतु त्यानी कुठल्याही शाळेत दाखला घेतला नसेल किंवा दाखला घेतला असेल परंतु त्यानी प्रारंभिक शिक्षण पूर्ण केले नसेल अशा परिस्थितीत त्याला त्याच्या वयाच्या अनुसार आवश्यक अशा वर्गात दाखला देण्यात यावा. अशा बालकास त्याच्या समकक्ष वयाच्या मुलाच्या बरोबरीने आणण्याकरीता त्यास विशेष प्रशिक्षण देण्याचे प्रावधान आहे. तसेच सदर बालकास प्रारंभिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत अथवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होण्याकरीता त्याचे वय १४ वर्षापेक्षा जास्त असले तरीही शिक्षण घेण्याचा अधिकार आहे.

३) ज्या शाळेत प्राथमिक शिक्षणाची सोय नाही अशा परिस्थितीत त्या बालकास प्राथमिक शिक्षण उपलब्ध असेल त्या शाळेत किंवा शाळा राज्यात किंवा राज्याबाहेर असेल त्या शाळेत दाखला देण्यात यावा. नवीन शाळेत प्रवेश घेण्याकरीता मुख्याध्यापकांनी तावडतोब दाखला दयावा. ज्या शाळेत मुलगा शिकत असेल त्या शाळेच्या मुख्याध्यापकांनी दाखला देण्याकरीता विलंब लागला हया कारणानी नवीन शाळेत प्रवेश देण्याकरीता नकार देण्यास हे कारण मानता येणार नाही. शाळेचे मुख्याध्यापक वा शाळेचे प्रभारी यांनी दाखला देण्यास विलंब लावला तर त्यांना शिस्तभंगाच्या कार्यवाहीस सामोरे जावे लागेल. (कलम ६)

४) कलम ७ नुसार शाळेकरीता लागणारे अनुदान देणे ही केंद्रशासन व राज्य शासनाची संयुक्तिक जबाबदारी असेल.

५) कलम ९ नुसार स्थानिक प्राधिकरणाने सर्व बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण पुरविणे बंधनकारक आहे. आई, वडीलांना किंवा पालकांना आपल्या पाल्यास स्थानिक प्राधिकरणाच्या शाळेत प्रवेश घ्यावयाचा नसेल व त्यांना स्थानिक प्राधिकरणाच्या व्यतिरिक्त चालविण्यात येणाऱ्या शाळेत प्रवेश घ्यावयाचा असेल त्यावेळेस त्यांना येणारा खर्च परत मागण्याचा त्यांना अधिकार राहणार नाही.

६) प्रत्येक आई, वडील व पालकांचे कर्तव्य आहे की त्याची आपल्या बालकास नजीकच्या शाळेत प्रारंभिक शिक्षण घेण्याकरीता दाखल करुन घ्यावे. (कलम १०)

७) ३ ते ६ वर्षापर्यंत वयाच्या बालकास मोफत प्रारंभिक शिक्षण देण्याची व्यवस्था सरकारची असेल. (कलम ११)

८) ज्या शाळेला सरकारतर्फे २५% वार्षिक अनुदान मिळते त्या शाळेनी ३ ते ६ वर्षे वयातील मुलांना प्रारंभिक शिक्षण मोफत देणे अनिवार्य आहे व त्याकरीता येणारा खर्च सरकारतर्फे जे सरकार प्रत्येक मुलावर खर्च करते त्याप्रमाणे त्या शाळेला सरकारतर्फे देण्यात येते.

९) शाळा दाखल्याच्या वेळेस कोणत्याही बालकाच्या आई, वडील किंवा पालकाकडून, छाननीच्या कारणांनी शुल्क वसूल करु शकत नाही. जर असे शुल्क शाळेतर्फे घेण्यात आले तर प्रत्येक विदयार्थ्यांकडून घेतलेल्या शुल्काच्या दहा पट रक्कम दंड म्हणून वसूल करण्यात येईल व तसेच प्रथम अपराधाकरीता रु.२५,०००/– तसेच दुसऱ्या अपराधाकरीता रु.५०,०००/– हयाप्रमाणे दंड वसूल करण्याचा प्रावधान हया कायदयात आहे. (कलम १३)

१०) कुणीही बालक जन्माचा दाखला नाही हया सबबीखाली प्रवेशाकरीता वंचित राहणार नाही. (कलम १४)

११) शिक्षकांचा गैर शैक्षणिक कार्यात उपयोग करण्यावर प्रतिबंध आहे. (कलम २७)

१२) कलम ३० अन्वये कुठल्याही बालकास प्रारंभिक शिक्षण पूर्ण केल्याशिवाय बोर्डाच्या परीक्षा देता येणार नाही. प्रारंभिक परीक्षा पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र प्रारंभिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर देण्यात येईल.

१३) बालकाच्या अधिकाराची सुरक्षा करण्याकरीता 'राष्ट्रीय आयोगा'ची तसेच 'राज्य आयोगा'ची निर्मिती करण्यात आलेली आहे. त्या आयोगास बालकांच्या विकासाकरीता आवश्यक असणारी संपूर्ण शक्ती प्रदान करण्यात आलेली आहे. (कलम ३१)

१४) कलम ३३ व ३४ नुसार तक्रार निवारणाकरीता राष्ट्रीय सलाहकार परिषद व राज्य सलाहकार परिषद निर्मित करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

१५) कलम ३५ अन्वये केंद्र सरकार जे योग्य वाटेल त्याप्रमाणे राज्य सरकार व स्थानिक प्राधिकरणास दिशा निर्देश देऊ शकते.

हया कायदयानुसार ६ वर्षे ते १४ वर्षापर्यंतच्या बालकास हे मोफत व सक्तीचे प्रारंभिक शिक्षण घेण्याचा अधिकार आहे व त्याचप्रमाणे कुठल्याही परिस्थितीत शाळा व्यवस्थापकाला मुलांना प्राथमिक शिक्षणाकरीता दाखला देणे आवश्यक आहे. हयामुळे सुशिक्षित भारताची निर्मिती होण्यास मदत होईल. जर भारताची जनता सुशिक्षित झाली तर एक नवीन सुशिक्षित, सुजलाम, सुफलाम भारताची निर्मिती होईल.

# अपंग व्यक्ति संबंधीचे कायदे

## मानसिक आरोग्य कायदा १९८७

मानसिकरित्या आजारी व्यक्तीस विशेष केंद्रात दाखल करता येते. त्या केंद्राना आपल्या सर्वसाधारण भाषेत पागलखाने म्हटले जाते.

या कायद्यांतर्गत नियमाप्रमाणे अशी मानसिकरित्या आजारी व्यक्ती स्वत: वा तिचे नातेवाईक मित्र दाखल्यासाठी संबंधित मानसिक रुग्णालयाच्या मुख्य अधिका—याकडे अर्ज करु शकतात.

अशा व्यक्तीला किती काळ मानसिक रुग्णालयात भरती ठेवायचे यासंबंधी अंतिम निर्णय संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्याच्या रिपोर्टवर अवलंबून असतो.

पोलिस अधिकाऱ्यास रस्त्यावर वा कुठेही फिरताना अशा मानसिक आजारी व्यक्ती एकट्या आढळल्यास त्यांना ताब्यात घेण्याचा अधिकार आहे. पण अटक केल्यावर २४ तासांत त्या व्यक्तीला त्या क्षेत्रातील न्यायाधिशासमोर हजर करावे लागते.

न्यायालये सर्व चौकशी अंती अशा व्यक्तींबाबत परिस्थितीनुरुप निर्णय घेऊ शकते. जसे त्याच्या नातेवाईकाकडे किंवा मानसिक रुग्णालयात दाखल करणे.

न्यायालय अधिकृत क्षेत्रातील मानसिकरित्या आजारी व्यक्तीची काळजी घेण्यासंबंधी त्या व्यक्तीच्या नातेवाईकास आदेश देऊ शकते. अशा आदेशाच्या उल्लंघनासाठी शिक्षा होऊ शकते.

**<u>मानसिकरित्या आजारी व्यक्तीचे मानवी हक्क :</u>**

मानसिकरित्या आजारी व्यक्तीचा शारीरिक वा मानसिक छळ करणे गुन्हा आहे.

अशा व्यक्तींचा उपयोग कोणत्याही वैज्ञानिक वा वैद्यकीय किंवा इतर प्रयोगासाठी, चाचण्यांसाठी वा शोधासाठी करता येत नाही. पण त्या व्यक्तीच्या फायद्यासाठी व त्याच्या नातेवाईकाच्या लेखी संमतीने त्याच्यावर प्रयोग करता येतात.

त्यांना साखळीने बांधून ठेवण्यावर मनाई आहे.

**<u>मानसिक रोग्यांच्या इस्पितळात खालील सोयी असणे आवश्यक असते त्यासंबंधीची जबाबदारी तेथील मुख्य अधिकाऱ्याची असते.</u>**

- स्वच्छ परिसर
- मोकळी हवा, पुरेसा प्रकाश
- स्वच्छतागृहे
- पिण्याच्या पाण्याची व जेवणाची व्यवस्थित सोय
- राहण्यासाठी व्यवस्थित सोयी

वरीलप्रमाणे मानके न पाळणाऱ्यास सहा महिनेपर्यंत कैद व रु १०००/— पर्यन दंडाची शिक्षा होउ शकते.

तसेच इतर नियमांच्या उल्लंघनासाठीही हीच शिक्षा होउ शकते.

अपंग व्यक्तीच्या सामाजिक व आर्थिक अधिकारांचे जतन करण्यासाठी हा कायदा करण्यात आला आहे.

**<u>या कायद्यात खालील सहा प्रकारच्या अपंगत्वाबद्दलचे नियम आहेत</u>**

- पूर्णत: अंध
- अंशत: अंध
- कुष्ठरोगी
- मुकबधीर
- शारीरिक अपंगत्व (हात – पायाने)
- मानसिक अपंग

या कायद्यानंतर कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी शिक्षणात वा नोकरीत (इतर अटी पूर्ण करीत असल्यास) अपंगत्वाच्या आधारे व्यक्तीबरोबर भेदभावपूर्ण वर्तणूक करणे बेकायदेशीर आहे.

१८ वर्षांपर्यंतच्या प्रत्येक अपंगव्यक्तीला मोफत शिक्षणाचा अधिकार आहे.

नोकरीत असताना अचानक कोणत्याही प्रकारचे अपंगत्व (पूर्ण वा अंशत:) आले म्हणून संबंधित व्यक्तीला नोकरीतून काढता येत नाही. अशा व्यक्तीचे पुनर्वसन करुन असलेल्या नोकरीवर व वेतनावर ठेवावे लागते किंवा त्या वेतनाएवढे किमान वेतन व पद असलेली नोकरी देणे शासनावर बंधनकारक असते.

प्रत्येक सरकारी शैक्षणिक संस्थेत व नोकरीत ३ टक्के आरक्षण अपंग व्यक्तींना ठेवले आहे.

अपंगत्वाच्या आधारे नोकरीतील पदोन्नती नाकारणे बेकायदेशीर आहे.

अंध व्यक्तीला कुठलीही परीक्षा लिहिताना लेखनीक मदतनीस म्हणून द्यावाच लागतो व नियमाप्रमाणे जादा वेळ द्यावा लागतो.

अपंगत्वाचे खोटे प्रमाणपत्र मिळवून अपंगांसाठीचे लाभ घेणाऱ्या व्यक्तींना दोन वर्षापर्यंत कैद व २० हजार रुपयांपर्यंत दंड ही शिक्षा होऊ शकते.

बेरोजगार अपंग व्यक्तींना शासनाकडून बेरोजगार भत्ता दिला जातो. त्यासाठी बेरोजगार अपंग व्यक्तीने संबंधित जिल्हयांच्या सेवायोजनकेंद्रात नियमाप्रमाणे लेखी अर्ज करावा.

या कायद्यांतर्गत असलेल्या सेवा सुविधांचा लाभ घेण्यासाठी अपंगत्वाचे प्रमाण किमान ४० टक्के असावे लागते.

अपंगत्व प्रमाणपत्र मिळविण्यासाठी संबंधित व्यक्तीला जिल्हयातील सिव्हिल सर्जनच्या कार्यालयात असलेल्या नमुना अर्जाद्वारे विनंती करावी लागते.

केंद्र/राज्य शासनाने स्थापन केलेल्या तीन सदस्यांच्या वैद्यकीय मंडळाद्वारे तपासणीनंतर सदर प्रमाणपत्र पाच वर्षासाठी दिले जाईल. या प्रमाणपत्रांत अपंगत्वाचा प्रकार व टक्केवारी नमूद असते. पाच वर्षानंतर सदर प्रमाणपत्राचे नुतनीकरण करावे लागते.

अपंग व्यक्तींना शासनातर्फे मिळणाऱ्या विविध सोयी सुविधांच्या लाभासाठी संबंधित जिल्हयाच्या समाज कल्याण कार्यालयाकडून अपंगत्व ओळखपत्र प्राप्त करावे लागते.

तसेच याच कार्यालयात सर्व सुविधांबद्दल विस्तृत माहिती मिळते.

अनुसुचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंध नियमाप्रमाणे अनुसूचित जाती – जमातीच्या व्यक्तीवर खुल्या प्रवर्गातील व्यक्तीने केलेल्या अत्याचारामुळे जर अत्याचारित व्यक्तीला १००टक्के अपंगत्व आल्यास व संबंधित व्यक्ती कमावती असल्यास अशा व्यक्तीस शासनाला २ लाख रुपये व व्यक्ती कमावती नसल्यास रुपये १ लाख मदत म्हणून द्यावे लागतात.

या कायद्यांतर्गत केंद्रस्तरावर एक व प्रत्येक राज्यात एक अपंगायुक्ताची नियुक्ती केली गेली आहे.

अपंगाच्या शैक्षणिक–नोकरीसंबंधीच्या तक्रार निवारणाचे काम अपंगायुक्त करीत असतात.

अपंगायुक्तांना दिवाणी न्यायालयाचे अधिकार असतात. कायद्याच्या अंमलबजावणीचे व शासनाच्या योजना राबविण्याचे कामही अपंगाआयुक्तालयाचे असते.

राष्ट्रीय व राज्य अपंगाआयुक्त स्वत: देखील अपंग व्यक्तीच्या अधिकाराच्या हननाबद्दल दखल घेउन कार्यवाही करु शकतात.

अपंगायुक्तांना त्यांनी केलेल्या कामाचा वार्षिक अहवाल केंद्रशासन व राज्यशासनाकडे पाठवावा लागतो व संबंधित शासनाला हे अहवाल लोकसभेत व विधानसभेत, त्यावर केल्या गेलेल्या कार्यवाहिसहित मांडावे लागतात.

कायद्याच्या अंमलबजावणीसाठी स्थापन केल्या गेलेल्या राष्ट्र व राज्य समन्वयक व कार्यकारी समित्यावर केंद्र व संबंधित राज्यशासनाने किमान एका अपंग महिलेची नियुक्ती करणे बंधनकारक आहे.

शासनाच्या अनेक गरिबी निर्मुलन योजनांमध्ये देखील अपंगांना ३ टक्के आरक्षण आहे. उदा. इंदिरा आवास योजना.

## अपंगत्वाच्या आधारे शिक्षण संस्थेत वा सरकारी नोकरीत भेदभाव झाल्यास तक्रार कुठे करता येते ?

केंद्र शासनाविरुध्द दिल्ली येथील राष्ट्रीय अपंगायुक्ताकडे लेखी तक्रार करता येते व राज्यशासनाविरुध्द राज्य अपंगायुक्ताकडे तक्रार करता येते.

महाराष्ट्रात पुणे येथे अपंगआयुक्ताचे कार्यालय आहे.

अपंगापैकी काही प्रकारच्या अपंगांचे गट अधिक संवेदनशील असतात. त्यामुळे ऑटिझम, सेरेब्रल पाल्सी, मतिमंदपणा वा एकाच व्यक्तीमध्ये विविध प्रकारचे अपंगत्व असणाऱ्या व्यक्तींच्या कल्याणासाठी राष्ट्रीय न्यास कायदा १९९९ लागू झाला. हा कायदा गंभीरपणे अपंग असलेल्या मुलांची विश्वसनीय व्यवस्था करण्याची विविध कुटुंबाची मागणी पूर्ण करण्यासाठी तयार करण्यात आला. या कायद्याची विशिष्ट उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत :

- अपंग व्यक्तींना, त्या ज्या समाजातून आल्या आहेत त्या समाजाच्या शक्य तितक्या जवळ व शक्य तितक्या स्वतंत्रपणे राहण्यासाठी समर्थ बनवणे.
- अपंग व्यक्तींच्या पालकांचा मृत्यू झाल्यास त्या अपंगांच्या काळजी व संरक्षणासाठी उपाययोजना करणे.
- या कायद्यात समाविष्ट केलेल्या अपंगांच्या कुटुंबाना अडचणीच्या कालखंडात मदत करण्यासाठी पंजीकृत संघटनांना सहाय्य देणे.

**<u>हा कायदा पुढील गोष्टी करतो :</u>**

- जिल्हा मॅजिस्ट्रेट पंजीकृत संघटनेचा एक प्रतिनिधी व एका प्रकारचे अपंगत्व असलेली एक व्यक्ती यांची स्थानिक पातळीवर एक समिती तयार करण्याचा निर्देश देतो.
- कायदेशीर पालकांची नियुक्ती बद्दलची पध्दती सांगतो. पात्रतेच्या अटी, पात्र उमेदवारांची परिस्थिती (ऑर्डर) उमेदवारांची अपात्रता यांच्याबद्दलचे नियमही निश्चित करतो.
- पालकांची कर्तव्ये ठरवून देतो. पालकाला विशिष्ट कालखंडाच्या अंतराने आपल्या पाल्याच्या मालमत्तेची माहिती स्थानिक पातळीवरील समितीला द्यावी लागते. त्याचप्रमाणे कायदेशीर पालकांनी समितीला सादर केलेल्या (आपल्या पाल्याच्या) मालमत्तेच्या व देण्यांच्या वार्षिक हिशेबाची नोंद ठेवावी लागते. या कायद्याचे व त्याच्या अंमलबजावणीचे पर्यवेक्षण करण्याचे काम राष्ट्रीय न्यास मंडळाकडे सोपवलेले आहे.
- न्यासाच्या निधीसाठी सरकारने १०० कोटी रुपये दिले आहेत. या रकमेवरील व्याजाचा वापर मंडळाच्या कामकाजासाठी केला जातो. तसेच महाराष्ट्र राज्य व इतर राज्यांनीदेखील या निधीत अधिक मदत केली आहे.

# इतर महत्वाच्या कायद्यांची माहिती

## वरिष्ठ नागरिकांचे अधिकार

कुटुंब संस्थेच्या पारंपारिक साच्यात आधुनिक काळात झालेले बदल लक्षात घेता कुटुंबातील वृध्दांचे स्थान व त्यांची देखभाल हे आता अडचणीचे ठरु लागले आहे. हयाचा पुरावा आपल्याला आजची परिस्थिती देते. आपल्या देशात वरिष्ठ नागरिकांना सांभाळण्याची जबाबदारी त्यांच्या पाल्यांवर असते. पूर्वी घरात हवे नको ते बघण्यासाठी मुलांची धडपड असायची. परंतु आज परिस्थिती बदललेली आहे. वरिष्ठ नागरिकांना बघण्याची, त्यांचे पालनपोषण करण्याची जबाबदारी मुले विसरत चालली आहेत. त्यांना वृध्द व्यक्ती असणे हे अडचणीचे वाटते हे वास्तव आहे. त्यातच आपापसात न पटणे, इस्टेट–पैसा, जमीन जुमला इत्यादी संदर्भात भांडणे, गैरसमज इत्यादींची भर पडली की त्या वृध्द व्यक्तींच्या पालनपोषणाची जबाबदारी झटकली जाते.

वरिष्ठ नागरिकास आर्थिक सहाय्य मिळावे, त्यांचे पालनपोषण नीट व्हावे हयाबाबत फौजदारी प्रक्रिया संहीतेमध्ये तरतूद केलेली आहे. सध्या वरिष्ठ नागरिकांकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलला आहे यांचा विचार करुन सन २००७ मध्ये आई–वडील व वरिष्ठ नागरिकांचे कल्याण व पालनपोषण अधिनियम २००७ (The maintenance and welfare of parents and senior citizens Act, 2007) अंमलात आणण्यात आला आहे. हया कायदयाची ठळक वैशिष्ठये खालीलप्रमाणे :–

१) वरिष्ठ नागरिक जे स्वतच्या कमाईने किंवा असलेल्या संपत्तीने स्वत:चे पालन पोषण करण्यास असमर्थ आहेत ती आपल्या मुलाच्या विरुध्द किंवा आपल्या नातेवाईकाच्या विरुध्द पोटगीचा अर्ज करु शकते.

२) सदर कायदयानुसार कोणीही वरिष्ठ नागरिक ज्यांच्या अंतर्गत आई–वडील, आजी–आजोबा आपल्या एक किंवा अनेक मुलांच्या विरुध्द जे अज्ञान आहे त्यांना वगळून त्यांच्या विरुध्द पालन पोषणाकरीता अर्ज करु शकतात.

२) ज्या वरिष्ठ नागरिकांना मुले नाहीत अशा परिस्थितीत ज्या नातेवाईकांना वरिष्ठ नागरिकांच्या मृत्यूनंतर त्यांची संपत्ती मिळणार असेल (सदर नातेवाईक अज्ञान नसावा) त्याच्याविरुध्द पालनपोषणाकरीता आवश्यक पोटगी करीता अर्ज करु शकतात.

३) सदर अधिनियमात मुले (children) या शब्दाच्या व्याख्येनुसार मुलगा, मुलगी, नात व नातू यांचा समावेश होतो परंतु व्यक्ती अज्ञान नसावी.

४) आई–वडील (Parents) या शब्दाच्या व्याख्येनुसार आई, वडील अभिप्रेत आहे. तसेच जैविक दत्तक सावत्र आई–वडीलांचा समावेश होतो.

५) वरिष्ठ नागरिकांस सर्वांप्रमाणे सामान्य जीवन जगण्याचा अधिकार आहे.

६) ज्यावेळेस एकापेक्षा जास्त नातेवाईकांना वरिष्ठ नागरिकाच्या मृत्यूनंतर संपत्तीचा वाटा मिळणार असेल त्यावेळेस वरिष्ठ नागरिकांच्या पालनपोषणाची जबाबदारी त्या नातेवाईकावर असते.

७) पालनपोषणाकरीता आवश्यक असणारा अर्ज कोण करु शकतो.

- वरिष्ठ नागरीक किंवा आई, वडील.
- वरिष्ठ नागरीक अर्ज करण्यास असमर्थ असेल अशा परिस्थितीत ज्या व्यक्तीस वरिष्ठ नागरीक प्राधिकृत करेल किंवा एखादया संघटनेमार्फत अर्ज करु शकते.
- न्यायाधिकरण स्वत: एखादया प्रकरणात दखल घेऊ शकतो.

८) न्यायाधिकरण अर्ज दाखल झाल्यानंतर दावा प्रलंबित असताना पालनपोषणाकरीता आवश्यक निर्वाह खर्चाबाबत अंतरीम हुकूम मुले, नातेवाईक यांना देऊ शकते.

९) न्यायाधिकरणाकडे अर्ज दाखल झाल्यानंतर त्या अर्जाबाबतची सूचना मुले किंवा नातेवाईक यांना देण्यात येते व त्यांचे त्या अर्जावरचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर किती रक्कम निर्वाह खर्चाकरीता देणे योग्य राहील हयाबाबत निर्णय घेते.

१०) पालनपोषणाकरीता केलेल्या अर्जावर मुलांना किंवा नातेवाईकांना नोटीसांची बजावणी झाल्यापासून ९० दिवसांच्या आत सदर अर्जावर हुकूम होणे आवश्यक आहे. काही अपरिहार्य कारणामुळे सदर मुदत ३० दिवसांकरीता न्यायाधिकरण वाढवू शकते. (५(४))

११) पालनपोषणाकरीता झालेला हुकूम हा एक किंवा अनेक व्यक्तींविरुध्द असेल अशा परिस्थितीत जर त्यातील एखादया व्यक्तीचा मृत्यू झाल्यास दुस-या व्यक्तीवर असलेल्या जबाबदारीत काहीच परिणाम होणार नाही.

१२) न्यायाधिकरणाने दिलेला हुकूम जर मुले किंवा नातेवाईकांनी यांनी पाळला नाही तर अशा वेळेस न्यायाधिकरण देय असलेली रक्कम वसूल करण्याकरिता अधिपत्र काढते. सदर अधिपत्राची अंमलबजावणी झाल्यास देय असलेल्या पालन पोषणाकरिताचा सर्व रकमेबद्दल किंवा रकमेच्या कोणत्याही भागाबद्दल एक महिन्याच्या मुदतीपर्यंत अथवा त्या संपूर्ण रकमेचा भरणा होईपर्यंत त्या व्यक्तीला कैदेची शिक्षा ठोठावता येते.

१३) वरिष्ठ नागरिक जो स्वत:चे पालनपोषण करण्यास असमर्थ आहे व त्यांची मुले किंवा नातेवाईक पालनपोषणाची जबाबदारी घेण्यास नाकारत असेल त्याबाबत न्यायाधिकरणाचे समाधान झाले असेल अशावेळेस पालनपोषणाकरीता प्रत्येक महिन्याकरीता निर्वाहाची रक्कम निश्चित करणे.

१४) पालन पोषणाकरीता देण्यात येणारी रक्कम राज्य शासनाने ठरवून दिलेली असेल त्याप्रमाणे

देण्याचे आदेश न्यायाधिकरण देऊ शकते. परंतु सदर रक्कम ही १०,०००/– प्रती महिना या पेक्षा जास्त नसावी.

१५) पालनपोषणाकरीता दयावयाच्या रक्कमेबाबत न्यायाधिकरणाने हुकूम केल्यानंतर ३० दिवसांच्या आत किंवा न्यायाधिकरण जसे आदेश देईल त्याप्रमाणे रक्कम भरणे आवश्यक आहे.

१६) न्यायाधिकरणाने केलेल्या हुकूमाच्या विरुध्द अपील करण्याकरीता प्रत्येक जिल्हयाकरीता एका अपिलीय न्यायाधिकरणाची राज्य शासनाने स्थापना करणे आवश्यक आहे.

१७) अपिलीय न्यायाधिकरणावर काम करणार हे जिल्हा न्यायाधीश पदापेक्षा कमी अर्हतेचा नसावा.

१८) न्यायाधिकरणाच्या हुकूमाच्या विरुध्द ६० दिवसांच्या आत अपील करणे आवश्यक आहे.

**<u>वृध्दाश्रमाची स्थापना</u> :–**

१) १५० वरिष्ठ नागरिकांची राहण्याची व्यवस्था होऊ शकेल असे वृध्दाश्रम प्रत्येक जिल्हयात एक हयाप्रमाणे असणे आवश्यक आहे.

२) वरिष्ठ नागरिकाला दयावयाच्या सुविधा, आरोग्य, मनोरंजन याबाबतचे मानदंड ठरविण्याकरीता व देखरेखीकरीता राज्य सरकार एक योजना आखेल.

**<u>वरिष्ठ नागरिकांकरीता वैद्यकीय सुविधा</u> :–**

१) सदर कायदयानुसार सरकारी दवाखाने अंशत: किंवा पूर्ण अनुदान प्राप्त दवाखान्यास वरिष्ठ नागरिकांकरीता पलंग व्यवस्था असणे आवश्यक आहे.

२) वरिष्ठ नागरिकांकरीता वेगळी रांग असावी.

३) जुनाट, जीवघेणा आजार किंवा निकृष्ठाअवस्थेत गेलेल्या आजारांकरीता वरिष्ठ नागरिकांच्या सुविधांमध्ये वाढ करण्यात यावी.

४) जुनाट आजारांवर करण्यात येणाऱ्या संशोधनात वाढ करण्यात यावी.

५) निकृष्ठाअवस्थेत असलेल्या वरिष्ठ नागरिकांची देखरेख करण्याकरीता हया आजारावर रुग्णास उपचार करण्यात तज्ञ डॉक्टर निशुल्क उपचार करेल.

**<u>वरिष्ठ नागरिकांचे जीवन व सुरक्षा व संपत्ती यांचे संरक्षण</u> :–**

१) वरिष्ठ नागरिकांच्या कल्याणा प्रित्यर्थ प्रचार व जागरुकता हयाबाबत टेलिव्हीजन, रेडीओ व मुद्रण माध्यमाचा उपयोग करुन नियमित कालावधीत हयाबाबत प्रचार करावा.

२) वरिष्ठ नागरिकांकरीता असलेल्या कायदयाबाबत केंद्र सरकार, राज्य सरकार ज्यात पोलिस अधिकारी, न्यायिक अधिकारी असेल यांना सदर कायदयाबाबत जागृती निर्माण करण्याकरीता प्रशिक्षण देण्यात यावे.

३) वरिष्ठ नागरिकांच्या कल्याणाच्या योजना संबंधित मुद्दयांचा विचार करण्याकरीता विधी विभाग, गृह आरोग्य व समाजकल्याण विभागातर्फे नियतकालीन पूनर्विलोकन करण्यात यावे.

संविधानपूर्व काळात रुढी परंपरा, धर्मकारण यामुळे अनुसूचित जाती अनुसूचित जमातीच्या लोकांना सर्व प्रकारचे अधिकार नाकारल्यामुळे त्यांना वंचित जीवन जगावे लागले. महात्मा ज्योतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज यांनी अशा लोकात अधिकाराची जाणीव निर्माण होण्यास व धर्मशास्त्राची चौकट मोडण्यासाठी अनुसूचित जाती अनुसूचित जमातीच्या लोकांना शिक्षण देणे आवश्यक आहे असा विचार मांडला आणि त्यांना जागे करावे म्हणून शाळा उघडल्या. शाहू महाराजांनी अस्पृश्यता निवारण्याचे जाहिरनामे काढले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनुसूचित जाती जमातीच्या लोकांना रुढी परंपरा व धर्मशास्त्राने दिलेले जगण्याचे सर्व प्रकार सोडून नवे जीवन जगण्याचा आदेश केला आणि धर्मशास्त्र व रुढीने ज्यांना अधिकार नाकारले अशा सर्व लोकांत मानवी अधिकाराची जाणीव निर्माण करण्याची क्रांती १९२७ मध्ये चवदार तळे सत्याग्रह आणि त्यानंतर काळाराम मंदिर सत्याग्रह व त्याशिवाय हजारो भाषणद्वारे डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी घडविली. त्यामुळे हा समाज अस्पृश्यतेमुळे जी बंधने होती ती झुगारुन नवे जगणे नवे धंदे करण्यास तयार झाला. एकदम जुने जगणे सोडले. मेलेली गुरे ओढायची नाहीत. शिळया उष्टया अन्नाची भीक मागायची नाही. सर्वाकडे फुकट बंधमजूरी करायची नाही. जुने धंदे बलुते करायचे नाही. असा निश्चय करुन मुलांना शिक्षण द्यायचे. चांगले कपडे घालायचे. चांगले ताजे अन्न खायचे व सर्व नागरी अधिकार बजावयाचे असा निर्धार करुन हा समाज नवे जीवन जगू लागला. रुढी व धर्मशास्त्राप्रमाणे तुम्ही का काम करत नाही असे म्हणून १९२७ नंतर सवर्ण लोकांनी अनुसूचित जातीच्या लोकांचे खून केले. मारहाणी केल्या. जमिनदार खोतांनी अनुसूचित जातीचे जे लोक कुळ होते त्यांच्या कडून जमिनी परत घेतल्या.

संविधान कर्त्यांनी अशा अनुसूचित जाती जमातीच्या समाजाची उन्नती घडविण्यासाठी भारतीय संविधानात अनेक मौलिक तरतूदी केल्या. भारताचे संविधान दिनांक २६.०१.१९५० ला लागू झाले. त्यामुळे २६ नोव्हेंबर १९४९ पूर्वीचे हक्क नाकारलेले लोक इतरांसह संविधानातील मुलभूत हक्कांचे हक्कदार झाले. संविधानाने सर्व भारतीयांना मुलभूत हक्क दिले. अनुच्छेद १७ प्रमाणे अस्पृश्यता नष्ट करण्यात आली व अस्पृश्यता पाळणे म्हणजे गुन्हा असेल त्यासाठी भारत सरकारने अस्पृश्यता अपराध कायदा पारित केला. याच कायद्याचे नांव बदलून नागरी हक्क संरक्षण कायदा, १९५५ असे आहे. उन्नतीचे मार्ग सुरु झाले. त्यामुळे अनुसूचित जातीचे लोक शिक्षण घेऊ लागले. पदव्या घेऊ लागले. संविधान लागू झाल्यानंतर अनुसूचित जातीच्या लोकांनी, अस्पृश्यतेची सर्व बंधने झुगारली. शिक्षणामुळे व संविधानातील अधिकारामुळे सरकारी नोकऱ्यात शिरले. सरकारी नोकर, अधिकारी होऊ लागले. उद्योगधंदे करु लागले. अर्थार्जन करु लागले. जमीन संपादन करु लागले. अधिकाराचा भंग होताच अधिकार प्राप्तीसाठी झगडू लागले. राजकीय अधिकारामुळे पदाधिकारी होउ लागले. सत्ता सूत्रे हाती घेऊ लागले. सवर्णांच्या बरोबरीने राहू लागले. त्यांच्यापेक्षाही चांगले जीवन जगण्याचा प्रयत्न करु लागले. थोडक्यात संविधानामुळे सर्व काही हिंदू धर्मशास्त्राविरुध्द घडू लागले. धर्मशास्त्र पाळणारे हिंदू सवर्ण यांच्या प्रथा परंपरेच्या विरुध्द प्रवाह सुरु झाला. त्यामुळे रुढी परंपरा धर्मशास्त्र पाळणारे लोक म्हणू लागले की हे अनुसूचित जातीचे लोक धर्मशास्त्राच्या पायरी प्रमाणे का वागत नाहीत? हे आमच्या आज्ञा का पाळत नाहीत? हे आम्हांला फुकटचा मानसन्मान का देत नाहीत? हे जोहार मायबाप हायाज मायबाप का म्हणत नाहीत? हे आमच्या पेक्षा ही चांगल्या घरात का राहतात? हे शेती उद्योगधंदे करुन सरकारी नोकऱ्या करुन अर्थार्जनामुळे आमच्यापेक्षा वरचढ का होतात? हे मोटार वाहने, कार का खरेदी करतात, हे मिरवणूका का काढतात? हे दागदागिने का घालतात?अनुसूचित जातीचे लोक उन्नतीचे प्रतिष्ठित जीवन जगू लागले, हे अत्याचाराचे प्रमुख कारण आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या क्रांतीमुळे भारताच्या संविधानामुळे जे जे लोक नवीन जीवन जगू लागले हे पाहून रुढी परंपरावादी हिंदू सवर्ण लोकांकडून १९२७ च्या क्रांतीनंतरच्या कालखंडापासून संविधान लागू झाल्या नंतरच्या कालखंडात अनेक ॲट्रासिटी अत्याचार घडू लागले. त्याची संख्या दिवसेंदिवस वाढू लागली. नागरी हक्क संरक्षण कायदा प्रभावीपणे अनुसूचित जातीच्या लोकांचे संरक्षण करण्यास असमर्थ

ठरला. संपूर्ण भारत देशात अनुसूचित जाती अनुसूचित जमातीवर गंभीर अत्याचार होउ लागले. त्याचे वर्गीकरण खालीलप्रमाणे :

१. खून

२. गंभीर जखमी

३. विनयभंग

४. बलात्कार

५. घरांची जाळपोळ

६. शेतीचे पिकाचे नुकसान

७. जातीवाचक शिवीगाळ करुन अपमान करणे

अशा अनेक अत्याचाराच्या घटनांचे प्रमाण वाढले. ही भयावह अत्याचाराची संख्या पाहून भारतीय संसदेने अशा अत्याचारांपासून अनुसूचित जाती जमातीचे संरक्षण करण्यासाठी आणि अत्याचाराचा प्रतिबंध करण्यासाठी अनुसूचित जाती अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम १९८९हा कायदा केला. या कायद्याचे बील संसदेत मांडताना हा कायदा करण्यासाठी उद्‌देश व कारणांचे निवेदन करण्यात आले, ते खालीलप्रमाणे :–

## <u>उद्‌देश व कारणे यांचे निवेदन</u>

(भारत सरकारचे राजपत्र, भाग विभाग दोन, दिनांक१९ ऑगस्ट १९८९)

१. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्या सामाजिक–आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी विविध उपाय योजना केलेल्या असल्या तरी या जातीजमातीचे लोक सर्वच बाबतीत मागासलेले व दुर्बल राहिले आहेत. अनेक नागरी अधिकारांपासूनही ते वंचित राहिलेले आहेत. ते अनेक अपराधांचे शिकार ठरलेले असून अप्रतिष्ठा, अपमान व गांजवणूकीला त्यांना तोंड द्यावे लागत आहे. केवळ मालमत्तेलाच नव्हे तर त्यांना त्यांच्या जीवितालाही मुकावे लागल्याच्या अनेक दुर्दैवी घटना घडलेल्या आहेत. ऐतिहासिक, सामाजिक आणि आर्थिक यासारख्या वेगवेगळया कारणांसाठी घडलेल्या अपराधांना ते बळी पडलेले आहेत?

२. शिक्षण इत्यादिच्या प्रसारामुळे अनुसूचित जाती व जमातीच्या लोकांमध्ये सामाजिक जाणिवेची जी नवी लाट निर्माण झाली तिचा परिणाम म्हणून ते आपल्या मूलभूत हक्कांविषयीची आपली मते समाजापुढे मांडण्याचा प्रयत्न करु लागले आहेत. परंतु याकडे अन्य समाजाचा दृष्टीकोन सहानुभूतीचा किंवा सामजस्याचा नाही, ज्या ज्या वेळी ते आपल्या हक्कांचे प्रतिपादन करतात आणि अस्पृश्यतेसारख्या प्रथेस विरोध करतात किंवा कायद्यानुसार किमान वेतनाची मागणी करतात किंवा त्यांच्यावर बळजबरीने लादलेली वेठबिगारीची कामे करण्यास नकार देतात, त्या त्या वेळी ज्याचे हितसंबंध या समाजामध्ये गुंतलेला आहे असा वर्ग आपल्या सत्तेच्या बळावर त्यांना नमवू पाहतो आणि त्यांना धाकदपटशा करतो. ज्या ज्या वेळी अनुसूचित जाती–जमातीची माणसे आपल्या आत्मसन्मानाचे आपल्या स्त्रियांच्या अब्रूचे रक्षण करण्याचा प्रयत्न करतात, त्या त्या वेळी ते समाजातील प्रभावी व बलिष्ठ वर्गाचा प्रखर क्रोध आपल्यावर ओढवून घेतात. अनुसूचित जाती–जमातीच्या माणसांनी जमिनीची वहिवाट करणे आणि तिच्यावर लागवड करणे हे देखील मग ती जमीन त्यांना शासनाने दिलेली का असेना खपवून घेतले जात नाही आणि कित्येकदा ही माणसे त्यांच्याकडे निहित हितसंबंध असलेल्या अशा लोकांच्या हल्ल्यांना बळी पडतात. अलिकडे अनुसूचित जातीच्या लोकांना मानवी विष्ठेसारखे अखाद्य घृणास्पद पदार्थ खाण्यास भाग पाडणे, निराधार अनुसुचित जाती–जमातीच्या लोकांवर हल्ले चढवून त्यांची सामुहिक हत्या करणे, त्यांच्या महिलांवर बलात्कार करणे यासारखे अत्याचार

करण्याचा समाजघातक कल वाढीला लागला आहे.

अशा परिस्थितीत नागरी हक्क संरक्षण १९५५ यासारखे प्रचलित कायदे व भारतीय दंड संहितेतील सर्वसाधारण तरतुदी अशा अपराधास आळा घालण्यासाठी अपुऱ्या असल्याचे आढळून आले आहे. म्हणून अनुसूचित जातीच्या व अनुसूचित जमातीच्या नसलेल्या व्यक्तीकडून त्या जाती–जमातीविरुध्द केल्या जाणाऱ्या अपराधांना आळा घालणे व त्या व्यक्तींना अपराधापासून परावृत्त करणे यासाठी नवीन प्रभावी कायदा करणे आवश्यक आहे. म्हणून भारत सरकारने अनुसूचित जाती अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा, १९८९ साली पारित केला.

३. अत्याचार या शब्दाची अद्यापपर्यंत व्याख्या करण्यात आलेली नाही. केवळ अत्याचार या शब्दाची व्याख्या करणेच नव्हे तर असे अत्याचार करण्याबद्दल कठोर शिक्षेची तरतुद करण्यासाठी जालीम उपाययोजना प्रस्तुत करणेही आवश्यक आहे. तसेच, सर्व सहभागी राज्यांनी व केंद्रशासित प्रदेशांनी अनुसूचित जाती–जमातीच्या व्यक्तींची पिळवणूक होऊ नये यासाठी विशेष प्रतिबंधात्मक व शिक्षात्मक उपाय योजावेत आणि जिथे अशा अत्याचारांच्या घटना घडल्या असतील तिथे अशा अत्याचारांची शिकार झालेल्या व्यक्तींना पुरेसे अर्थसहाय्य तसेच त्यांच्या पुनर्वसनासाठी सहाय्य देण्याची तरतूद करावी. असेही प्रस्तावित करण्यात आले आहे.

या वरील सर्व कारणाशिवाय अ‍ॅट्रासिटीची अन्य कारणे खालीलप्रमाणे आहेत –

१. अनुसूचित जाती अनुसूचित जमातीची संख्या गावात अल्प असल्यामुळे ते प्रतिकार करु शकत नाहीत.

२. विविध राज्य सरकारे, भारत सरकारने अनुसूचित जाती अनुसूचित जमातीच्या आर्थिक सामाजिक उन्नतीच्या योजना करुन सुध्दा सर्वाधिक लोक अद्यापही गरिबी रेषेच्या खालील जीवन जगतात असा दुबळा समाज असल्यामुळे त्यांच्यावर अत्याचार होतो.

३. अनुसूचित जाती अनुसूचित जमातीच्या महिलांचे शिक्षणाचे प्रमाण अल्प आहे. खेडयातील अनुसूचित जाती जमातीच्या महिला निरक्षर असल्यामुळे त्यांच्यावर अधिक अत्याचार वाढत आहेत.

४. अनुसूचित जाती जमातीचे लोक त्यांच्या श्रध्देप्रमाणे त्यांचे उध्दारकर्ते मुक्तीदाते असणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करतात आणि जाणीव जागृती साहित्या द्वारे निर्माण करण्यासाठी सभा संमेलने घेतात. अण्णा भाऊ साठे, संत रोहिदास यांच्या जयंती निमित्त मिरवणूकी काढत असल्यामुळे सवर्ण लोक चिडतात आणि अनुसूचित जाती व जमातीवर अशा प्रसंगी अत्याचार घडतात. हिंदु धर्मीय ग्रामीण लोकांना असे वाटते की अनुसूचित जाती अनुसूचित जमातीचे लोक मिरवणूका काढून रुढीबाहय व धर्मशास्त्रा विरुध्द धर्मबाहय कृत्य करतात. त्यांच्या या विकृत भावनेमुळे अत्याचार घडतात.

रुढीवादी परंपरावादी धर्मशास्त्र पालक हिंदूनी संविधान मूल्यानुसार समता स्वातंत्र न्याय बंधुता या तत्वानुसार आता सर्व भारतीय बंधू आहोत. आम्ही भारतीय सारे एक आहोत ही भावना वाढविली, आणि देश हितासाठी जुन्या संकल्पना सोडल्या तर निश्चितपणे भारत अत्याचार मुक्त भारत देश होईल. यासाठी भारत हे राष्ट्र जागतिक स्तरावर प्रतिष्ठित राष्ट्र घडविण्यासाठी देशातील अनुसूचित जाती जमातीवर होणारे अत्याचार संपले पाहिजे. देशात कुठेही अत्याचाराची घटना घडणार नाही असे वातावरण निर्माण होऊन सर्व भारतीयांत समताधिष्ठित बंधुभाव निर्माण झाला पाहिजे. त्यासाठी शासकीय यंत्रणा समाज सेवी संस्था सामाजिक कार्यकर्त्यांनी देशभर अत्याचार मुक्त भारत निर्मितीचे अभियान सुरु करावे अशी प्रथम गरज निर्माण झाली आहे. कारण आज भारतभर अत्याचारातील संख्या वाढत आहे ही चिंतेची बाब आहे.

# मोटार/वाहन व रेल्वे अपघात नुकसान भरपाई विषयक माहिती

एखादया व्यक्तीचा मृत्यू इतर व्यक्तीच्या चुकीमुळे, निष्काळजीपणामुळे किंवा दोषांमुळे झाला तर मृत व्यक्तीच्या वारसांना दोषी व्यक्तीकडून प्राणांतिक अपघात कायदा १८५५ मधील तरतुदींनुसार भरपाई मागता येते. त्यासाठी दिवाणी न्यायालयात दावा दाखल करता येतो. मृत व्यक्तींच्या वारसांमध्ये पत्नी, नवरा, मुले आणि आई–वडील यांचा समावेश आहे. भरपाई व्यतिरिक्त कौटुंबिक, हानी आणि दाव्याच्या खर्चाची सुध्दा मागणी करता येते. व्यक्तीच्या मृत्यूमुळे जे नुकसान झाले आहे, त्याचा विचार करुन दिवाणी न्यायालय प्रस्तुत दाव्यात योग्य व वाजवी अशी रक्कम प्रत्येक वारसांस योग्य त्या हिश्याप्रमाणे देते. अशाप्रकराचा दावा मृत व्यक्तींच्या व्यवस्थापकाने किंवा प्रतिनिधीने दाखल केला असेल तर मिळालेली भरपाई मृत व्यक्तीच्या मिळकतीची मत्ता (भाग) समजली जाते. ज्या वारसांनी किंवा प्रतिनिधीने किंवा व्यवस्थापकाने असा दावा दाखल केला आहे त्याची पूर्ण माहिती दाव्यात नमूद करावी लागते.

१) मोटार वाहनाच्या अपघातामुळे एखादी व्यक्ती जखमी झाली किंवा मयत झाली तर जखमी व्यक्तीस किंवा मयत व्यक्तीच्या वारसांना मोटार वाहन कायदयानुसार स्थापित झालेल्या अपघात न्यायाधीकरणात ज्या वाहनाच्या चुकीमुळे अपघात झाला त्या वाहनाचा मालक व वाहनाची विमा कंपनी यांचे विरुध्द अर्ज करुन भरपाई मागता येते. जखमांमुळे कायमचे अपंगत्व आले असेल तर त्या व्यक्तीस रु.२५,०००/– इतकी व अपघातामुळे जी व्यक्ती मयत झाली आहे त्या व्यक्तीच्या वारसांना एकूण रु.५०,०००/– इतकी अंतरिम भरपाई अर्ज प्रलंबित असतांना मोटार वाहन कायदा, १९८८ च्या कलम १४० अन्वये मिळू शकते. अंतरिम भरपाईचा आदेश करतांना वाहन चालकाचा दोष आहे किंवा नाही याचा विचार करणे आवश्यक नाही.

२) जखमी व्यक्तीस गुणावगुणावरती भरपाईचा आदेश देताना त्या व्यक्तीच्या जखमांचे स्वरुप, अशा जखमांमुळे त्याची उत्पन्न मिळविण्याची क्षमता, त्याचे भविष्यातील उत्पन्न यावर काही विपरीत परिणाम झाला आहे काय या बाबी विचारात घ्याव्या लागतात. वैदयकीय उपचारासाठी त्याने केलेला खर्च तसेच अपघातातील जखमांमुळे त्याला झालेला शारिरीक व मानसिक त्रास या गोष्टीसुध्दा विचारात घ्याव्या लागतात.

३) उदा. अपघातात झालेल्या जखमांमुळे त्या व्यक्तीस १०० टक्के कायमचे अपंगत्व आल्यास त्याचे उत्पन्न मिळविण्याची क्षमता नाहीशी होऊन त्यास भविष्यात काहीही उत्पन्न मिळविता येणार नाही असे म्हणता येईल. त्यास अनुसरुन त्याचे वय, त्याचे मासिक उत्पन्न आणि मोटार वाहन कायदा, १९८८ च्या कलम १६३अ अन्वये दुसऱ्या परिशिष्टात नमूद केलेला गुणांक यानुसार भरपाईची रक्कम ठरविता येते. तसेच अशा व्यक्तीस झालेल्या जखमांमुळे उदा. ५० टक्के इतके कायमचे अपंगत्व येऊन तेवढयाच प्रमाणात त्याची उत्पन्न मिळविण्याची क्षमता कमी झाली असेल तर त्या प्रमाणात वरीलप्रमाणे नुकसान भरपाईची रक्कम ठरविता येते.

४) मयत व्यक्तीच्या वारसांना मिळणारी भरपाईची रक्कम ठरवितांना मयत व्यक्तीचे उत्पन्न, त्याचे वयास अनुरुप असा गुणांक, तो जिवंत असता तर त्याला स्वतःसाठी येणारा खर्च, त्याचे उत्पन्नावर

अवलंबून असणा–या व्यक्तींची संख्या, कौटुंबिक नुकसान, कुटुंबास होणारा शारिरीक व मानसिक त्रास, मृताचे क्रियाकर्म करण्यासाठी देय असणारी ठराविक रक्कम या सर्व बाबी विचारात घ्याव्या लागतात.

५) भरपाई अर्जाचा गुणावगुणावरती निकाल करतांना अपघात, वाहन चालकाच्या बेदरकार व निष्काळजीपणामुळे झाला आहे असे शाबीत करण्याची अर्जदारांची जबाबदारी असते.

६) अपघातामध्ये एकापेक्षा दोन वाहनांचा समावेश असेल तर दोन्ही वाहनांच्या मालकांविरुध्द व विमा कंपनीविरुध्द किंवा ज्या वाहनाच्या चालकामुळे अपघात झाला आहे त्या वाहनाचा मालक आणि विमा कंपनी यांचेविरुध्द भरपाईची मागणी करता येते.

७) अपघात ज्या वाहनाने केला आहे त्या वाहनाचा अपघात समयी विमा उतरविला नसल्यास विमा कंपनी नुकसान भरपाई देणेस जबाबदार नसते. अपघात समयी वाहनाचा विमा होता. परंतु, विम्यातील अटी व शर्तीचा भंग वाहन मालकाने जाणूनबुजून केला आहे असे शाबीत झाल्यास विमा कंपनी नुकसान भरपाई देण्यास जबाबदार रहात नाही.

८) न्यायाधिकरणाने आदेश पारीत करुन भरपाईची रक्कम ठरविली असल्यास व ती रक्कम वाहन मालकाने किंवा विमा कंपनीने न दिल्यास भरपाईच्या रक्कमेची वसुली करणेसाठी त्यांचेविरुध्द दरखास्त दाखल करता येते.

रेल्वे चालू असताना रेल्वेचा अपघात झाल्यास अपघातात जखमी झालेला प्रवासी किंवा निधन पावलेल्या प्रवाशाच्या वारसांना रेल्वे प्रशासनाची चूक अथवा दोष अथवा निष्काळजीपणा असो किंवा नसो रेल्वे भरपाई दावे अधिकरण कायदा १९८७ च्या कलम १२३ अन्वये रेल्वे प्रशासनाकडून भरपाई मागता येते. या व्यतिरिक्त संबंधित प्रवाशाच्या सामानाचे काही नुकसान झाले असल्यास त्याची भरपाईसुध्दा रेल्वे प्रशासनाकडून रेल्वे भरपाई दावे अधिकरणामध्ये मागता येते. 'प्रवासी' या संज्ञेत ज्याच्याकडे कायदेशीररित्या वितरण केलेले तिकीट किंवा पास किंवा अनुज्ञप्ती असेल अशी व्यक्ती आणि रेल्वेचे कामावर असलेले नोकर याचा समावेश होतो. भरपाई मागण्याचा अर्ज कलम १२५ अन्वये दावे अधिकरणाकडे जो प्रवासी जखमी झाला आहे त्यास किंवा त्याचे मार्फत नेमलेली व्यक्ती, प्रवासी अज्ञान असेल तर त्याचेकरीता त्याचा पालक, प्रवासी मृत झाला असेल तर त्याच्यावर अवलंबून असलेल्या वारसांना करता येतो. प्रवासी मयत झाल्यामुळे देय भरपाईची रक्कम ही त्याचेवर अवलंबून असलेल्या सर्व वारसांच्या फायद्याकरीता असते. कलम १२५ नुसार केलेल्या अर्जात रेल्वे प्रशासनाकडून अंतरिम भरपाई मागता येते.

मृत व्यक्ती विवाहीत असेल तर त्याच्या वारसांमध्ये पत्नी, नवरा, मुलगा, मुलगी आणि मृत व्यक्ती अविवाहीत किंवा अज्ञान असेल तर त्याचे आई–वडील यांचा समावेश होतो. तसेच अज्ञान भाऊ, अविवाहीत बहीण, विधवा बहीण, विधवा सून हे सुध्दा मृत व्यक्तीच्या उत्पन्नावर अवलंबून असतील तर त्यांचा त्याच्या वारसांमध्ये समावेश होतो. त्याचप्रमाणे अपघातापूर्वी मयत झालेल्या मुलीचे अज्ञान मुल आणि आजी आजोबा हे जर मृत व्यक्तीच्या उत्पन्नावर अवलंबून असतील तर त्यांचा सुध्दा वारसांमध्ये समावेश होतो.

ग्राहक संरक्षण कायदा १९८६ हा केंद्र सरकारने दिनांक ०१ / ०७/१९८७ रोजी अंमलात आणून तो जम्मू व काश्मिर या राज्यांव्यतिरीक्त सर्व देशांत लागू केला. सदर कायदयाच्या नावामधूनच सदरचा कायदा हा कोणत्या घटकांच्या संरक्षणासाठी करण्यात आलेला आहे हे स्पष्ट होत आहे. समाजामध्ये प्रत्येक व्यक्ती ही ग्राहक असते मात्र, या ग्राहकाच्या संरक्षणाकरीता सदरहू कायदा अंमलात येणेपूर्वी ग्राहकाच्या संरक्षणासाठी जरी कायदे करण्यात आलेले होते उदा. अन्न भेसळ प्रतिबंधक कायदा १९५४, अत्यावश्यक सेवा कायदा १९५५, मक्तेदारी प्रतिबंधक कायदा १९६९, वजन माप कायदा १९७६, विशेष पूर्तता कायदा १९६३, भारतीय करार कायदा १८७२ या कायदयांद्वारे ग्राहकाच्या हिताकरीता प्रयत्न केले जात होते. परंतू सदरचे प्रयत्न अपुरे पडत होते व या कायदयातील तांत्रिक क्लिष्टतेमुळे ग्राहकांना न्याय मिळणेकरीता विलंब होत होता. त्यामुळे तो अनुचित व्यापार प्रथा, साठेबाजार, दुय्यम प्रतीची सेवा इ. अनिष्ट प्रवृत्तींना बळी पडत असे. या महत्वपूर्ण बाबी कायदेमंडळाच्या लक्षात आलेनंतर ग्राहकांचे पर्यायाने सर्वसामान्य जनतेच्या अन्यायाचे निराकरण कमी पैशांत, कमी कालावधीत व कमीतकमी श्रमामध्ये होणेकरीता सदरचा कायदा निर्माण करण्यात आला.

या कायदयाच्या कार्यकक्षेमध्ये सर्वप्रकारच्या सेवा, उत्पादने, विमा, कंपन्या, थिएटर, मॉल, हॉस्पिटल, बँका, वाहतुक संस्था (रेल्वे, बस, विमान, समुद्र) विज पुरवठा, बांधकाम या व इतर सर्व प्रकारच्या सेवा व उत्पादनांचा समावेश केलेला आहे. थोडक्यात, (सदरचा कायदा हा ग्राहकाच्या दैनंदिन आयुष्यामध्ये तो करीत असलेल्या सर्व कृत्ये समाविष्ट केलेली आहेत.) त्यामुळे सदरचा कायदा हा सर्वंकश असा आहे.

सदर कायदयाप्रमाणे (कलम २(१)अ) प्रमाणे ग्राहक म्हणजे जो योग्य असा मोबदला देऊन एखादी सेवा अगर उत्पादीत केलेली वस्तू दुसऱ्या व्यक्ती अगर संस्थेकडून घेत असतो त्या व्यक्तीस ग्राहक असे म्हणता येईल. याप्रकारे योग्य मोबदला म्हणजेच भारतीय करार कायदा कलम २ प्रमाणे कायदेशीर मोबदला देऊन घेतलेल्या सेवेस अगर उत्पादित केलेल्या वस्तुमध्ये कोणत्याही प्रकारची त्रुटी, हानी, अनुचित व्यापार प्रथा इ. आढळल्यास त्याविरुध्द ग्राहकाला ग्राहक न्यायालयामध्ये दाद मागता येते. याकरीता ग्राहक न्यायालयांची चार स्तरांवर स्थापना करण्यात आलेली आहे ती पुढीलप्रमाणे –

### १. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच –

ग्राहक चळवळीमधील सर्वात खालच्या स्तरावर म्हणजेच

जिल्हा पातळीवर ग्राहकांच्या तक्रारींची दाद मागण्याकरीता जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच हे त्या त्या जिल्हयातील ग्राहकांच्या तक्रारीनुसार सोडवणूक करीत असतात. थोडक्यात जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाचे कार्यक्षेत्र हे तो तो जिल्हा असतो. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच यांच्याकडे दाद मागण्यासाठी पूर्वी कोणत्याहीप्रकारे मुद्रांक शुल्क देण्याची आवश्यकता नव्हती. मात्र आता नवीन सुधारीत नियमाप्रमाणे शुल्क देणे गरजेचे आहे. मात्र हे शुल्क अत्यंत नाममात्र स्वरुपात आहे. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच यांना दिवाणी व फौजदारी न्यायाधिशांचे सर्व अधिकार देण्यात आलेले आहेत. म्हणजेच जिल्हा मंच हे शपथेवर पुरावा घेऊ शकतात. साक्षीदारांना समन्स काढून साक्ष देण्याकरीता पाचारण करु शकतात तसेच

न्यायनिवाडा देऊन निवाडयाची अंमलबजावणी न झाल्यास विरुध्द पक्षकारास दंड आकारुन त्या दंडाची त्याने भरपाई न केल्यास त्यास तुरुंगात टाकून स्थावर अगर स्थावर जंगम मालमत्ता जप्त करुन त्यामधून नुकसान भरपाईची किंवा दंडाची रक्कम वसूल करु शकतात. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचामध्ये एकूण ३ सदस्यांची नेमणूक केली जाते. सदस्यांपैकी एक अध्यक्ष हा जिल्हा न्यायाधिशाच्या श्रेणीचा अधिकारी समजला जात असून त्याची नेमणूक महाराष्ट्र शासन उच्च न्यायालयाच्या सल्ल्याने करीत असते. उर्वरित दोन सदस्यांपैकी एक सदस्य महिला सदस्य असते अन्य सदस्य हा पुरुष सदस्य असतो.

या दोन्हीही सदस्यांस कमीतकमी ग्राहक चळवळीत किंवा अर्थ, कायदा, वाणिज्य, उदयोग किंवा प्रशासनातील १० वर्षाचा अनुभव असणे क्रमप्राप्त आहे. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाचा कालावधी हा जास्तीत जास्त ५ वर्षांकरीता देण्यात आलेला आहे. ५ वर्षानंतर निवडसमितीच्या सल्ल्याने पुनर्नेमणूक देता येते. मात्र कोणत्याही परिस्थितीत वयाची ६५ वर्षे पूर्ण केलेल्या व्यक्तीस सदस्य म्हणून काम पाहता येत नाही.

जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाला जास्तीत जास्त २०,००,०००/— पर्यंतचे दावे दाखल करुन घेऊन ते निकाली काढण्याचा हक्क व अधिकार आहे. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचामध्ये सदरचा कायदा अंमलात आला तेव्हा कोणनेही मुद्रांक शुल्क अगर नोंदणी फी दयावी लागत नसे. मात्र, वेळोवेळी करण्यात आलेल्या कायदयातील सुधारणेप्रमाणे रु १,००,०००/— रु. १००/— रु १,००,०००/— ते रु ५,००,०००/— रु.२००/— रु ५,००,०००/— ते रु १०,००,०००/— रु. ४००/— व रु १००,०००/— ते रु २०,००,०००/— रु ५००/— अशी नोंदणी फी / मुद्रांक शुल्क देणे गरजेचे आहे. सदरचे शुल्क हे जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाच्या अध्यक्षांच्या नांवे राष्ट्रीयकृत बँकेच्या डिमांड ड्राफ्ट द्वारे देणे गरजेचे आहे.

तक्रारदाराने त्याची तक्रार ही सुवाच्य हस्ताक्षरांत अगर टंकलिखित करुन त्यासोबत त्या तक्रारीच्या पुष्टयर्थ सर्व कागदपत्रांचे ३ संच मंचाकरीता व जेवढे प्रतिपक्षी असतील त्याकरीता प्रत्येकी १ असे संच करुन तक्रार दाखल करावी लागते. तदनंतर मंचाचे अध्यक्ष हे दाखल केलेल्या तक्रारीवर विचार करुन त्याप्रमाणे प्रतिपक्षास नोटीस काढून त्याचे प्रतिपक्षाचे म्हणणे ऐकून न्यायदानाचे काम करतात. सदरचे कामकाज हे समरी पध्दतीने चालत असल्यामुळे शपथपत्राद्वारे पुरावा नोंदविला जातो. कोणत्याही पक्षाची उलटतपासणी घेणेची असल्यास त्याकरीता योग्य त्या कारणांसह सुनावणीच्या वेळेस मंचाकडे अर्ज सादर करुन मंचाने परवानगी दिल्यानंतर उलटतपासणी घेता येते. अन्यथा दाखल कागदपत्रे व पुराव्याच्या शपथपत्राच्या आधारे न्यायदान केले जाते. आवश्यक वाटल्यास तक्रारीच्या पुष्टयर्थ तक्रारदाराला साक्षीदारांची शपथपत्रे देखील दाखल करता येतात. सामान्यत: तक्रार दाखल झालेनंतर प्रतिपक्षास नोटीस प्राप्त झालेपासून ३ ते ५ महिन्यांमध्ये तक्रारीचा निपटारा करावा असे कलम १३ ३—अ मध्ये नमूद केलेले आहे. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचास सिव्हिल कोर्टाचे सर्व अधिकार आहेत. तसेच कायदयातील कलम २५ प्रमाणे जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचास त्यांनी स्वत: दिलेल्या निर्णयाची राज्य आयोगाने दिलेल्या निर्णयाची राष्ट्रीय आयोगाने दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे सर्व अधिकार आहेत. याकरीता स्वतंत्र दरखास्त पिटीशन दाखल करुन आदेशाची अंमलबजावणी करुन मागता येते. प्रतिपक्षाने आदेशाची अंमलबजावणी न केल्यास त्यास तुरुंगात टाकण्याविषयीचे अधिकार देखील मंचास आहेत.

अशारितीने त्या त्या जिल्हयांत ग्राहक तक्रार निवारण मंच ग्राहक तक्रार निवारणाचे काम करीत असतात.

## २. राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग –

जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाने दिलेल्या निर्णया विरोधात ३० दिवसांच्या आत योग्य कारणे नमुद करुन राज्य आयोगाकडे अपिल दाखल करता येते. या आयोगामध्ये देखील ३ सदस्य काम करीत असतात या तीन सदस्यांपैकी एक अध्यक्ष व उर्वरीत दोन सदस्य असतात. सदस्यांपैकी एक सदस्य महिला सदस्य असते. राज्य आयोगांच्या अध्यक्षांची श्रेणी ही उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्तीसमकक्ष असते. ही निवड राज्यशासन उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीच्या सल्ल्याने करीत असते. उर्वरीत दोन सदस्यांची नेमणूक देखील निवड समितीच्या सल्ल्याने राज्य शासन करीत असते. सदस्यांना कायदा, अर्थ वाणिज्य, प्रशासन किंवा इतर विषयांमधला कमीत कमी १० वर्षांचा अनुभव असणे क्रमप्राप्त आहे.

राज्य आयोगाची मुदत देखील पाच वर्षांची असून ५ वर्षांचा काळ संपल्यानंतर निवड समितीच्या सल्ल्याने पुनर्नेमणूक करता येते. मात्र ६७ वर्षे पूर्ण झाल्यानंतर कोणत्याही व्यक्तीस राज्य आयोगाचा सदस्य म्हणून नेमणूक करता येत नाही. राज्य आयोगाची कार्यकक्षा ही विभागात विभागण्यात आलेली आहे. यापैकी राज्य आयोगांना रक्कम रुपये वीस लाख ते एक कोटीपर्यंत निवाडे दाखल करुन त्यांचा दाद मागण्याचा अधिकार देण्यात आलेला आहे. तसेच जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंचाने दिलेल्या निकालाचा पुनर्निरीक्षण करण्याचा अधिकार देखील देण्यात आलेला आहे.

## ३. राष्ट्रीय आयोग –

राज्य आयोगाने दिलेल्या निर्णया विरोधात ३० दिवसांच्या आत योग्य कारणे नमुद करुन राष्ट्रीय आयोगाकडे अपिल दाखल करता येते. राज्य आयोगाने दिलेल्या निर्णयाच्या विरुध्द दाद मागण्याकरीता राष्ट्रीय आयोगाची स्थापना करण्यात आलेली आहे. यामध्ये देखील एक अध्यक्ष व जास्तीत जास्त ४ सदस्यांची नेमणूक करता येते. या ४ सदस्यांपैकी एक सदस्य महिला सदस्य असते. राष्ट्रीय आयोगाचा अध्यक्ष हा सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधिशाच्या समकक्ष असतो तसेच सदस्य हे कमीत कमी अर्थ, वाणिज्य, कायदा प्रशासन किंवा इतर विषयांमध्ये कमीतकमी १० वर्षांचा अनुभव असणा–या व्यक्ती असतात.

राष्ट्रीय आयोग हा संपूर्ण देशाकरीता काम पाहत असतो. राज्य आयोगाने दिलेल्या निकालाविरुध्द राष्ट्रीय आयोगाकडे अपिल दाखल करता येते तसेच राज्य आयोगाच्या निकालांचे पुनर्निरीक्षण करण्याचा अधिकार देखील राष्ट्रीय आयोगाला असतो. तसेच राष्ट्रीय आयोग हा जिल्हा मंचाचे अध्यक्ष व राज्या आयोगाच्या अध्यक्षांच्या नेमणूकीबाबत सल्ला देण्याचे देखील काम करीत आसतो.

## ४. सर्वोच्च न्यायालय –

राष्ट्रीय आयोगाच्या निर्णयाविरुध्द दाद मागण्याकरीता सर्वोच्च न्यायालयात दाद मागावी लागते. याकरीता राष्ट्रीय आयोगाने दिलेल्या निकालापासून ३० दिवसांचे आत अपिल दाखल करणे आवश्यक आहे. मात्र, ही दाद मागतांना राष्ट्रीय आयोगाने दिलेल्या दंडाच्या रक्कमेपैकी ५० टक्के किंवा रक्कम रुपये ५०,०००/– यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम प्रथम सर्वोच्च न्यायालयात भरणा करणे आवश्यक आहे अशा रक्कमेचा भरणा केल्याशिवाय अपिल दाखल करता येत नाही.

## (अ) अटक झालेल्या व्यक्तिचा अधिकार आणि अटक करणाऱ्या अधिकाऱ्याचे कर्तव्य : -

### (१) फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४१ ब अन्वये :-

अटक करण्याची कार्य पध्दती आणि अटक करणाऱ्या अधिकाऱ्याचे कर्तव्य - प्रत्येक पोलिस अधिकारी अटक करताना : -

अ) त्याने स्वत:चे अचूक दृष्यमान आणि स्पष्टपणे ओळख दर्शविण्यात येईल अशी नावांची पट्टी बाळगणे, ज्या योगे त्यांची सहजतेने ओळख पटण्यास मदत होईल.

ब) अटकेत दरम्यान ज्ञापन (पंचनामा) करणे व जे -

१) कमीत कमी एका साक्षीदारा द्वारा, जो अटक झालेल्या व्यक्तिच्या कुटुंबाचा सदस्य किंवा जेथे अटक झाली असेल, त्या परिसरातील प्रतिष्ठीत व्यक्ति असेल, त्याच्या द्वारा साक्षांकित केले जाईल.

२) अटक व्यक्तिच्या द्वारा प्रतिस्वाक्षरीत केले जाईल, आणि

क) अटक झालेल्या व्यक्तिच्या कुटुंबातील सदस्याने ज्ञापन (पंचनामा) साक्षांकित केला नसल्यास अटक व्यक्तिस त्याच्या नातेवाईकास किंवा मित्रास त्यांच्या अटके संबंधी माहिती देण्याचा अधिकार आहे असे पोलिस अधिका-याने अटक करतेवेळी सांगावे.

### (२) फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४१ ड अन्वये :-

प्रश्न चौकशी दरम्यान, अटक झालेल्या व्यक्तिस त्याच्या पसंतीच्या वकिलास भेटण्याचा हक्क आहे. जेव्हा एखादया व्यक्तिस पोलिसद्वारा अटक होऊन प्रश्न चौकशी करण्यास येत असेल ,त्यावेळी, संपूर्ण, प्रश्न चौकशी कालावधी दरम्यान जरी नसेल तरी, त्या प्रश्नचौकशीच्या वेळी, अटक झालेल्या इसमास पसंतीच्या वकिलास भेटण्याचा अधिकार आहे.

### (३) फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ५० - अ अन्वये : -

जेव्हा एखादया व्यक्तिस अटक होते त्या वेळी , फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम- ५० -अ, नुसार खाली नमूद आवश्यक अनुपालन काटेकोरपणे करण्यात यावे:-

१) अटक झालेल्या व्यक्तिस , त्याचा मित्र, नातेवाईक, किंवा अन्य व्यक्तिस त्यांच्या द्वारा, त्यांच्या अटकेची आणि त्यास ज्या ठिकाणी स्थानबध्द केले आहे, त्या जागेची माहिती देण्याकरिता, विनंती करण्याचा अधिकार

२) अटक झालेल्या व्यक्तिस त्यांच्या अधिकारा संबंधी माहिती देण्याचे पोलिस अधिकाऱ्यांचे कर्तव्य.

३) ज्या व्यक्तिस अटकेची माहिती दिली आहे, त्याबाबतची पोलीस ठाणे दैनंदिनीत करावयाची नोंद.

४) ज्या दंडाधिकाऱ्या समक्ष अटक झालेल्या इसमास हजर केले जाते त्यांचे कर्तव्य म्हणजे सदर

आवश्यक बाबींची पूर्तता केल्याची खात्री करणे.

५) जो पोलिस अधिकारी अटक करील, त्याने अटक करण्याची कारणे, ज्यावरुन पोलीसांकडून झालेल्या प्रत्येक अटकेचे समर्थन करावे लागेल, असे ध्वनित होणारी कारणे, प्रकरण दैनंदिनीत (केस डायरीत) नोंदवून ठेवावीत.

**(४) फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम - ५४ अन्वये : -**

**अटक झालेल्या व्यक्तिची वैद्यकिय अधिकारी द्वारा तपासणी :**

१) जेव्हा एखाद्या व्यक्तिस अटक करण्यात येईल, त्यावेळी त्याची तपासणी केंद्र किंवा राज्य शासनाच्या सेवेतील वैद्यकिय अधिकारी द्वारा केली जाईल आणि जर वैद्यकिय अधिकारी उपलब्ध नसेल तर अटकेनंतर लगेचच नोंदणीकृत वैद्यकिय अधिकारी द्वारा तपासणी करण्यात येईल. परंतु अटक झालेली व्यक्ति स्त्री असेल, तर तिची शारिरीक तपासणी केवळ स्त्री वैद्यकिय अधिकारी द्वारा किंवा देखरेखीखाली करण्यात येईल आणि जर स्त्री वैद्यकिय अधिकारी उपलब्ध नसल्यास, नोंदणीकृत स्त्री वैद्यकिय व्यवसायी द्वारा तपासणी करण्यात येईल.

**(५) फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम - ५५ अ अन्वये:**

अटक झालेल्या व्यक्तिचे आरोग्य व सुरक्षितता : आरोपीचा ताबा ज्या व्यक्तिकडे आहे. त्या व्यक्तिने आरोपीच्या आरोग्याची व सुरक्षिततेची वाजवी काळजी घेण्याचे कर्तव्य आहे.

**(ब) न्याय चौकशीअधीन बंदी म्हणजे काय ?**

तपास, चौकशी किंवा खटल्याच्या न्यायचौकशी दरम्यान कारागृहात स्थानबध्द असलेली व्यक्ती किंवा ज्या व्यक्तीस जामीन मंजूर झालेला नाही आणि अजूनही तुरुंगात आहे किंवा जामीन मंजूर झालेला आहे, परंतु जामीनदार / जमानतपत्र देण्यास असमर्थ आहे अशा व्यक्तींना न्यायचौकशीअधीन बंदी संबोधण्यात येते.

**(क) फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम - १६७ (२) व ४३७ (६) अंतर्गत जामीनावर मुक्त होणाऱ्या न्यायाधीन बंदीचे अधिकार : -**

**(१) फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम - १६७ (२) अन्वये :**

या कलमांतर्गत ज्या दंडाधिकारीचे समक्ष आरोपीस हजर करावयाचे आहे, त्या दंडाधिकाऱ्यास, प्रकरण चालविण्याची अधिकारिता असो वा नसो, संपूर्ण कालावधी पंधरा दिवसांपेक्षा जास्त नसेल अशा कालावधी करिता, वेळोवेळी, अशा दंडाधिकाऱ्यास योग्य वाटेल अशा अभिरक्षेत स्थानबध्द ठेवण्याचा अधिकार असेल, आणि त्यास (दंडाधिकाऱ्यास) प्रकरण चालविण्याची किंवा संपरिक्षेसाठी पाठविण्याची अधिकारिता नसल्यास आणि अधिक स्थानबध्दता (अभिरक्षता) अनावश्यक वाटत असल्यास, सदर दंडाधिकारी, ज्या दंडाधिकाऱ्यास अधिकारिता आहे त्याच्या समक्ष आरोपीस पाठविण्याचा आदेश पारित करते.

परंतु -

(अ) जर दंडाधिकारी यांना तसे करण्यासाठी पुरेसे कारण असल्याची खात्री झाल्यास, सदर दंडाधिकारी पोलीस कोठडी शिवाय , पंधरा दिवसांच्या कालावधी नंतर आरोपी व्यक्तिस स्थानबध्दतेत ठेवण्याचा अधिकार असेल, परंतु कोणत्याही दंडाधिकाऱ्यास या परिच्छेदानुसार आरोपी व्यक्तिस खाली नमूद एकूण कालावधीपेक्षा जास्त कालावधीकरीता स्थानबध्दतेत ठेवण्याचा अधिकार नसेल.

१) नव्वद दिवस, मृत्युदंडाची, जन्मठेपेची शिक्षा किंवा दहा वर्षापेक्षा कमी नाही अशा कालावधीच्या तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकेल, अशा गुन्ह्याशी संबंधीत तपासणी असेल,त्यात

२) साठ दिवस, ज्यात इतर गुन्ह्यांशी संबंधीत तपासणी असेल त्यात आणि यथास्थिती, नव्वद दिवसांचा कालावधी किंवा साठ दिवसांचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर , जर तो जमानत सादर करण्यास तयार असेल किंवा जमानत सादर करीत असल्यास, त्यास जामीनावर सोडण्यात येईल आणि या उपकलमान्वये जामीनावर मुक्त झालेली व्यक्ति, प्रकरण तेहतीसच्या तरतुदी अन्वये त्या प्रकरणाच्या उद्देशा करीता मुक्त झाल्याचे समजण्यात येईल.

**(२) फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७ (६) अन्वये :-**

जर दंडाधिकारी द्वारा चालविण्या योग्य कोणत्याही प्रकरणात, ज्या व्यक्ति विरुध्द अजामिनपात्र गुन्ह्याचा आरोप आहे अशा खटल्याच्या प्रकरणात पुरावा नोंदवण्यासाठी निश्चित केलेल्या प्रथम तारखे पासून साठ दिवसांच्या कालावधीत खटला पूर्ण न झाल्यास, अशी व्यक्ति, जर या संपूर्ण कालावधीत कोठडीत असल्यास, दंडाधिकाऱ्याने लेखी स्वरुपात नोंदविण्यात येणाऱ्या कारणाकरिता अन्यथा निर्देश दिले असल्यास ते खारीज करून, अशा व्यक्तिस दंडाधिकाऱ्यांची खात्री झाल्यावर जामीनावर सोडवण्यात येईल.

**(ड) आपणास जामीन/वैयक्तिक बंद (जमानत) पत्रावर मुक्त होण्याचा अधिकार आहे.**

**(अ) फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३६ अंतर्गत आपणास जर,**

- जामीनपात्र गुन्ह्यात आरोपित केले असल्यास
- आपणास जामीन मंजूर झाला परंतु आपण जामीनदार सादर करण्यास असमर्थ असल्यास आणि
- अटकेच्या दिनांकापासून ७ दिवसांपर्यंत आपण कोठडीत असल्यास

उदा. : जर आपल्या विरुध्द भारतीय दंड विधानाच्या कलम ३२३ अंतर्गत शारिरीक इजा करण्याचा आरोप असल्यास व आपणास १ एप्रिल २०१० रोजी अटक झाली असल्यास आणि आपण जामीन सादर करण्यास असमर्थ असल्यास, आपणास जामीनदाराशिवाय, जमानत/वैयक्तिक जमानत पत्रावर, ८ एप्रिल २०१० पर्यंत मुक्त करणे आवश्यक आहे.

## (ब) फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३६ अ अंतर्गत जर,

- आपल्याविरुध्द देहदंडाची शिक्षा होईल असा गुन्हा केल्याचा आरोप नसल्यास आणि
- ज्या गुन्ह्यासाठी आपणास आरोपित केले आहे, त्या गुन्ह्याकरीता असलेला अधिकतम विहीत कारावास कालावधी आपण पूर्ण केलेला असल्यास.

उदा. : जर भारतीय दंड विधानाच्या कलम ३७९ अंतर्गत चोरी केल्या करीता आपण आरोपित असल्यास आणि जर आपण ३ वर्षे किंवा जास्त कालावधी पर्यंत कारागृहात स्थानबध्द असल्यास, फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३६ अ नुसार जमानत / वैयक्तिक जमानत पत्रावर मुक्त होण्याचा आपणास अधिकार आहे.

## (इ) फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३६अ अंतर्गत जामीनावर मुक्त होण्यास आपणास विचारात घेता येईल, जर -

- आपण देहदंडाची शिक्षा होईल अशा गुन्ह्याकरीता आरोपित नसल्यास आणि
- ज्या गुन्ह्यासाठी आपणास आरोपित केले आहे त्या गुन्ह्याकरीता असलेला अधिकतम विहीत करावयाच्या कालावधीचा अर्धा (निम्मा) कालावधी आपण भोगलेला असल्यास,

उदा. : भारतीय दंड विधानाच्या कलम ३९५ अंतर्गत दरोड्याच्या गुन्ह्यासाठी आपण आरोपित असल्यास आणि आपण १० किंवा जास्त वर्षांपर्यंत कारागृहात स्थानबध्द आहात, तर आपण फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३६अ अन्वये जामीन मिळविण्याकरीता अर्ज करण्यास पात्र आहात.

टीप : भारतीय दंड विधानाच्या कलम ५७ नुसार, ज्या गुन्ह्याकरीता अधिकतम विहीत कारावासाचा कालावधी आजन्म कारावास आहे, त्या करीता १० वर्षांचा कालावधी अर्धा (निम्मा) कालावधी असेल.

सरकारी अभियोक्ता यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, संबंधित न्यायालय -

- वैयक्तिक जमानत पत्रावर, जामीनदारासह किंवा जामीनदाराशिवाय मुक्त करण्याचा आदेश देऊ शकेल.
- कारणे नोंदवून व्यक्तीस जामीनावर मुक्त करु शकेल किंवा
- लेखी कारणे नोंदवून स्थानबध्दता कायम ठेवण्याचा आदेश देऊ शकेल.

टीप : कोणत्याही परिस्थितीत, गुन्ह्यासाठी अधिकतम विहीत कारावासाच्या कालावधीपेक्षा जास्त कालावधी पर्यंत व्यक्तीस स्थानबध्द करता येणार नाही.

## (ई) आपण फौ. प्र. सं. कलम ४३६ ब ४३६-अ अंतर्गत जामीना करीता अर्ज करु शकता.

- जामीना करीता अर्ज दाखल करण्याकरीता आपल्या वकीलाशी संपर्क साधून किंवा
- आपल्या करीता वकीलाची नेमणूक करणे आपणास आर्थिक दृष्ट्या शक्य नसल्यास, आपल्या जिल्हयातील विधी सेवा प्राधिकरण किंवा समितीकडे मोफत विधी सहाय्यासाठी अर्ज करून.
- आपण प्रकरण सुनावणी न्यायालयाकडे प्रकरणामध्ये बचावाकरीता मोफत कायदेविषयक सहाय्य मिळणेकरीता अर्ज करु शकता.
- कारागृह अधिक्षकाशी संपर्क साधून किंवा महानिरिक्षक (कारागृह) यांना पत्र पाठवून, अर्ज करु शकता.

# कामगार नुकसान भरपाई कायदेविषयक माहिती

## कामगार भरपाई कायदा १९२३

प्रस्तुत कायदयानुसार कामगार त्याचे नेमून दिलेले काम करीत असताना अपघात होऊन तो जखमी झाला किंवा मयत झाला तर त्यास किंवा त्याचे वारसांना भरपाई देण्याची संबंधित मालकाची जबाबदारी असते. काम करीत असतांना झालेल्या जखमांमुळे कामगार पूर्णपणे अपंग झाला तर त्याला त्याच्या मासिक पगाराच्या ६० टक्के इतकी किंवा कमीत कमी रु.९०,०००/— इतकी भरपाई मिळू शकते. परंतु कामगार मयत झाला तर त्याच्या मासिक पगाराच्या ५० टक्के इतकी किंवा कमीत कमी रु. ८०,०००/— इतकी नुकसान भरपाई मिळू शकते. टक्केवारी प्रमाणे भरपाई दयावयाची झाल्यास कामगाराचे वय आणि प्रस्तुत कायदयाचे परिशिष्ट—४ मध्ये नमूद केलेप्रमाणे संबंधित घटक विचारात घ्यावा लागतो. अशी भरपाई मिळणेसाठी अपघातानंतर कामगार न्यायालयाकडे संबंधित कामगारास किंवा तो मयत असेल तर त्याचे वारसांना अर्ज करता येतो. वारस ठरवितांना संबंधित कामगारावर प्रत्यक्षपणे कोण अवलंबून होते, त्यांनाच भरपाई मिळू शकते. कामगार जखमी किंवा मयत झाल्यास त्यास अनुसरुन देय असलेली रक्कम संबंधित कंपनी किंवा मालक यांनी कामगार न्यायालयात जमा करणे बंधनकारक आहे.

शिक्षण हा सर्वांगिण विकासाचा पाया असताना सुध्दा रॅगिंग सारख्या सैतानी व हैवानी कृतींना विद्यार्थ्यांना सामोरे जावे लागते. 'रॅगिंग' हा शब्द महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना व जनतेला परिचयाचा झाला आहे.

रॅगिंग म्हणजे विद्यापीठ, महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या, विद्यार्थ्यांकडून कोणतीही लेखी किंवा तोंडी कृती की ज्यामुळे एखाद्या विद्यार्थ्याला दु:ख किंवा कष्ट होईल असे असभ्य वर्तन, सिनियर विद्यार्थ्यांनी ज्युनिअर विद्यार्थ्यांना इतरांसमोर अपमानास्पद वागणूक देणे, त्याचा छळ करणे किंवा एखादया विद्यार्थ्याला त्याच्या मनाविरुध्द कृत्य करण्यास भाग पाडणे. तसेच त्यांच्यात दहशतीचे व भितीचे वातावरण निर्माण करणे तसेच त्यांच्याकडून अमानवीय गैर प्रकार करुन घेतले जातात. अशी सर्व कृत्य म्हणजे रॅगिंग होय.

रॅगिंग कृत्यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे जीवन उध्वस्त होते, तो शिक्षणापासून दुर जातो. रॅगिंग हा प्रकार इतका क्रुर व भयावह असतो की, त्यात विद्यार्थ्याला प्राणसुध्दा गमवावा लागतो किंवा कॉलेजदेखील सोडावे लागते.

अशा प्रकारची क्रूर थट्टा रोखण्यासाठी महाराष्ट्र शासनाने रॅगिंग प्रतिबंधक कायदा तयार केला आहे. यामध्ये रॅगिंग करणे किंवा रॅगिंग करण्यास मदत करणे हा दखलपात्र शिक्षेस पात्र गुन्हा आहे.

रॅगिंग कायदयाच्या कलम ४ नुसार जी व्यक्ती, कोणत्याही शैक्षणिक संस्थेमध्ये किंवा तिच्याबाहेर प्रत्यक्षरीत्या किंवा अप्रत्यक्षरीत्या रॅगिंग करीत असेल किंवा त्याचा प्रचार करीत असेल तर त्या व्यक्तीला अपराध सिध्दीनंतर दोन वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल आणि ती दहा हजार रुपयांपर्यंत असेल इतक्या द्रव्य दंडाची शिक्षा होण्यास ती पात्र असेल.

कलम ५ :— या कायदयाच्या कलम ५ नुसार विरोधात रॅगिंगचा अपराध करणाऱ्याला अपराध सिध्दीनंतर शैक्षणिक संस्थेमधून काढून टाकण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. ती अशी कलम ४ खालील एखाद्या अपराधाबद्दल अपराधी सिध्द ठरलेल्या कोणत्याही विद्यार्थ्यास, शैक्षणिक संस्थेतून काढून टाकण्यात येईल आणि अशा प्रकारे काढून टाकण्यात आल्याच्या आदेशाच्या दिनांकापासून पाच वर्षाच्या कालावधीकरीता कोणत्याही इतर शैक्षणिक संस्थेमध्ये अशा विद्यार्थ्यास प्रवेश देण्यात येणार नाही.

कलम ६ :— या कायदयानुसार विद्यार्थ्यांना निलंबित करणे या संबंधी तरतूद आहे.

(१) जेव्हा कोणताही विद्यार्थी किंवा यथास्थिती आई, वडील किंवा पालक किंवा शैक्षणिक संस्थेचा प्रमुख, पूर्वगामी तरतुदींना बाधा न आणता, तक्रार मिळाल्यापासून सात दिवसाच्या आत तक्रारीमध्ये नमूद केलेल्या प्रकरणाची चौकशी करील आणि जर प्रथमदर्शनी ती खरी असल्याचे आढळून आल्यास अपराधाचा आरोप असलेल्या विद्यार्थ्याला निलंबित करील, आणि ती शैक्षणिक संस्था ज्या क्षेत्रामध्ये असेल त्या क्षेत्रावर अधिकारीता असलेल्या पोलिस ठाण्याकडे तक्रार पुढील कार्यवाहीसाठी त्वरीत पाठवील.

(२) ज्या बाबतीत पोट कलम (१) अन्वये मिळालेल्या तक्रारीमध्ये प्रथमदर्शनी काही तथ्य नसल्याचे शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखाने केलेल्या चौकशीनंतर सिध्द झाल्यास त्या बाबतीत तो तक्रारदाराला वस्तुस्थितीबाबत लेखी कळवील.

(३) विद्यार्थ्यांचा रॅगिंगमध्ये सहभाग आहे असा पोट कलम (१) अन्वये शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखाने दिलेला निर्णय अंतिम असेल.

**कलम ७ च्या कायदयाच्या कलम ७ अन्वये – <u>अपप्रेरणा (चेतावनी) दिल्याचे मानणे ही तरतूद आहे ती अशी</u> :–**

रॅगिंगची तक्रार केली असताना कलम ६ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने कारवाई करण्यात शैक्षणिक संस्थेचा प्रमुख कसूर किंवा हयगय करीत असेल तर अशा व्यक्तीस रॅगिंगसारख्या, अपराधाला चिथावणी दिली असल्याचे मानण्यात येईल. कलम ८ नुसार राज्य शासनाला नियम करण्याचा अधिकार आहे.

**<u>महाराष्ट्र रॅगिंग करण्यास मनाई अधिनियम, १९९९ ची ठळक वैशिष्ट्ये</u> :–**

१) रॅगिंग कायदयातील तरतुदीनुसार या कायदयात तरतूद केलेले कोणतेही कृत्य, शिक्षण संस्थेत किंवा शिक्षण संस्थेच्या बाहेर केलेले कृत्य हे दखल पात्र अपराधी स्वरुपाचे व जामीनपात्र आहे.

२) रॅगिंग करण्यास व अशा कृत्यास कायदयाने मनाई केलेली आहे.

३) रॅगिंग करणाऱ्या विरुध्द गुन्हा सिध्द झाल्यास त्यास २ वर्षापर्यंत शिक्षा होऊ शकते किंवा १०,०००/– पर्यंत दंड होऊ शकतो.

४) रॅगिंग करणा–या विद्यार्थ्यांच्या विरोधात अपराध सिध्द ठरल्यास त्यास शिक्षण संस्थेतून काढून टाकण्यात येते.

५) असा आदेश दिल्यापासून ५ वर्षापर्यंत कोणत्याही शिक्षण संस्थेमध्ये रॅगिंग करणाऱ्या विद्यार्थ्यास प्रवेश देता येत नाही.

६) तक्रार केल्यापासून सात दिवसाच्या आत तक्रारीमध्ये नमूद केलेली तक्रार खरी असल्याचे प्रथमदर्शनी आढळल्यास त्या विद्यार्थ्याला निलंबित किंवा काढून टाकण्यात येते.

७) अशा अपराधाबद्दल शिक्षण संस्थेचा प्रमुख किंवा शिक्षण संस्थेच्या पोलिस क्षेत्रातील पोलिस स्टेशनकडे तक्रार करु शकतो.

८) रॅगिंगची तक्रार केली असता कलम ६ मध्ये नमूद केलेल्या तरतुदीने कारवाई करण्यास शैक्षणिक संस्थेचा प्रमुख कसूर किंवा हयगय करीत असेल तर अशा व्यक्तीने रॅगिंग सारख्या गुन्हयाला मान्यता दिली असे मानण्यात येते आणि त्यास गुन्हयास जबाबदार धरले जाऊ शकते. अशा शैक्षणिक संस्थेच्या प्रमुखाला चिथावणी दिल्याचे मानण्यात येते आणि अपराध सिध्दीनंतर कलम ४ नुसार शिक्षा केली जाऊ शकते.